| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०२ वा | मंगळवार दिनांक २१ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## शिवभवानी शिल्प; आणखी बारकावे तपासले जाणार -आ. पाटील यांची राज्याच्या कला संचालनालयाला भेट

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या शिरपेचात १०८ फूट उंच शिवभवानी शिल्पामुळे आणखी मानाचा तुरा खोवला जाणार आहे. हे शिल्प आध्यात्मिक, ऐतिहासिक आणि धार्मिक अंगाने परिपूर्ण असावे यासाठी या क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांकडून प्रतिकृतींचे आणखी बारकावे तपासले जाणार आहेत. राज्याच्या कला संचालनालयाकडे सादर करण्यात आलेल्या एकूण १४ प्रतिकृतींपैकी पाच प्रतिकृतींची निवड करण्यात आली आहे. धार्मिक आणि प्राचीन इतिहास क्षेत्रातील तज्ञांकडून केल्या जाणाऱ्या सूचनांप्रमाणे पुन्हा नव्याने निवड करण्यात आलेल्या शिल्पकारांना दुरुस्तीसह प्रतिकृती सादर करण्यासाठी एक महिन्याचा अवधी देण्यात येणार आहे. आपण स्वतः शनिवारी कला संचालनालयाल भेट दिली. प्रचंड ऊर्जेचे स्रोत असलेल्या छत्रपती शिवरायांना आशीर्वाद देत असलेल्या तुळजाभवानी मातेच्या शिल्प प्रतिकृतीचे मनोभावे दर्शन घेतल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे साकारण्यात येणाऱ्या १०८ फूट उंच शिवभवानी शिल्पासाठी पाच प्रतिकृतींची निवड राज्याच्या कला संचालनालयामार्फत करण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या एकूण १४ प्रतिकृतींपैकी निवडण्यात आलेल्या या पाच शिल्प प्रतिकृतींची पाहणी पुन्हा एकदा तज्ज्ञांच्या समितीकडून केली जाणार आहे. त्यातील अध्यात्मिक, धार्मिक आणि ऐतिहासिक बारकावे तपासल्यानंतरच कुलस्वामिनी तुळजाभवानी माता छत्रपती शिवरायांना आशीर्वाद देत असतानाचे १०८ फूट उंचीचे भव्य शिल्प अंतिम केले जाणार आहे. शिल्पकला ,प्राचीन इतिहास संशोधन,धार्मिक आदी क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांच्या या समितीत सहभाग असणार आहे. निवडण्यात आलेल्या प्रतिकृतींची अत्यंत बारकाईने पाहणी केल्यानंतर तज्ञांच्या या समितीकडून आवश्यकतेनुसार काही सूचना आणि फेरबदल सुचविले जातील. आणि त्यानंतर या पाचही शिल्पकारांना सुचविण्यात आलेले फेरबदल आणि सूचना यानुसार पुन्हा एकदा शिवभवानी शिल्पाची प्रतिकृती सादर करण्यासाठी एक महिन्याचा वाढीव वेळ देण्यात येणार आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या पाचपैकी एक प्रतिकृती अंतिम केली जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

अष्टभुजा 'शिवभवानी'चा अंगावर शहारे आणणारा प्रेरणादायी विचार सर्व भाविकांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा तुळजापुरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून या शिल्पाची उभारणी केली जात आहे. तुळजाभवानी मातेचे १०८ फुट उंचीचे ब्रॉंझ धातूचे शिल्प साकारण्यात येणार आहे. श्री तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना आशीर्वाद देत असतानाचे हे शिल्प असणार आहे. हे शिल्प कसे असावे, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत अशा १४ शिल्पकारांनी अडीच ते तीन फूट उंचीचे फायबरचे मॉडेल राज्याच्या कला संचालनालयाकडे सादर केले होते. ज्या प्रसंगावर हे शिल्प उभारण्यात येणार आहे, त्याचे धार्मिक, ऐतिहासिक महत्व मोठे आहे. त्यातील बारकावे अधीक गांभीर्याने समजून घेण्यासाठी एकवेळा मुदतवाढही देण्यात आली होती. त्यानंतर प्राप्त झालेल्या १४ शिल्पांतून ५ शिल्पांची निवड करण्यात आली.

**संग्रहालयासह माहिती केंद्रही उभारले जाणार**

या नियोजित भव्य शिल्पामुळे भाविकांना केवळ धार्मिक अनुभूतीच नव्हे तर राष्ट्रनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपतींचे प्रेरणास्थान असलेल्या आई तुळजाभवानी देवीचा आशीर्वाद घेत असलेला अद्वितीय आणि अनुपम देखावा देखील अनुभवता येणार आहे. हे शिल्प श्रद्धा आणि प्रेरणेचे रोमांचक प्रतीक असणार आहे. हे प्रेरणादायी आणि भव्य शिल्प ३ मजली इमारती एवढ्या आकाराच्या बेसमेंटवर उभारले जाणार आहे. या बेसमेंटच्या आत एक संग्रहालय व माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे. तसेच २० एकर जागेवर आकर्षक बगीचा साकारण्यात येणार आहे, सोबत आकर्षक प्रकाश योजनाही केली जाणार आहे त्यामुळे तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या सौंदर्यात आणखी वाढ होणार आहे.

## परंड्यात पूरग्रस्त विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्याचे वाटप



परंडा (प्रतिनिधी)-परंडा तालुक्यात सप्टेंबर महिन्यात मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झाले. नद्यांना पूर आल्यामुळे खूप लोकांचे संसार उद्ध्वस्त झाले. त्याच वेळी जिल्हा परिषदेच्या शाळेसह मुलांच्या वह्या, पुस्तके, दप्तर पाण्यात भिजल्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांसमोर समस्या निर्माण झाली. अंतरगाव, लाखी व साकत (बु) या तीन पूरग्रस्त गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या मदत दिली. विषय शिक्षकांसह विद्यार्थ्यांसमोर मांडला असता सर्वांनी सहमती दर्शवली. त्यानुसार शाळेतील अगदी नर्सरीपासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी साहित्याच्या स्वरूपात मदत जमा केली. त्यामध्ये पेन, पेन्सील, खोडरबर, कंपास, बॅग, वह्या इत्यादी साहित्य विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही जमा केले. शाळेने एकत्र येऊन जमा केलेलं सर्व साहित्य आज त्या तीनही गावातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष गोरख मोरजकर व सचिव आशा मोरजकर यांनी यासाठी पुढाकार घेतला. या वेळी सचिव आशा मोरजकर म्हणाल्या, शिक्षण आपल्याला ज्ञानी बनवतं, पण माणुसकी आपल्याला माणूस म्हणून जगायला शिकवते. आज माझ्या चिमुकल्यांनी दाखवलेली संवेदनशीलता खूप मोलाची आहे. विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्य रूपात मदत गोळा करण्याचा एकच उद्देश होता की, लहानपणीच मुलांमध्ये मदतीची भावना जागृत व्हावी, त्यांच्या भावी आयुष्यात त्यांनी माणुसकी जपावी, त्यांच्यामध्ये इतरांप्रति सकारात्मक भावना निर्माण व्हावी हा एकमेव उद्देश होता. अशा प्रकारे दिली मदत या उपक्रमांतर्गत ४९५ वह्या, ४९० पेन, पेन्सील, केच पेन, खोडरबर इत्यादी साहित्य जवळपास ९० हून अधिक मुलांना मदत म्हणून देण्यात आले. या चिमुकल्यांनी केलेली छोटीशी मदत पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचं नुकसान भरून काढण्यासाठी उपयुक्त ठरेल.

## क्राईम न्युज

### अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :आरोपी नामे-पवन बापु पवार, वय ३० वर्षे, रा.कल्पनानगर पारधी पिडी कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१६.१०.२०२५ रोजी १३.०० वा. सु. कळंब शहरातील जुने बसस्थानकातील मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ गुटखा केसर युक्त विमल पान मसाला एकुण ४८० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना कळंब पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### काठी व पिस्तुलचा धाक दाखऊन ३-७ जणांनी लुटले

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी डॉ. अब्दुल गफुर रऊ जफनैदी, वय ६७ वर्षे, रा. जुनैदी मैन्शन रा.सातरस्ता सोलापूर जि. सोलापूर हे दि. १६.१०.२०२५ रोजी तुगाव एक किमी अंतरावर थोडे वळण असलेल्या ठिकाणी येणेगुर शिवार ता. उमरगा येथुन ईर्टींगा कार क्र एमएच ०४ एचएफ१८७५ यामधून जात होते. दरम्यान रोडवर एक लोखंडी जॉकवर कार आदळल्याने फिर्यादी व त्यांचे नातेवाईक वाहनामधुन उतरल्यावर अज्ञात सहा ते सात व्यक्तीनी काठी व पिस्तुलचा धाक दाखवुन फिर्यादीचे जावई व भाच्वी यांचे कडील रोख रक्कम २३,००० व १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ८०,००० किंमतीचा माल जबरीने हिसकावुन घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-डॉ. अब्दुल गफुर जुनैदी यांनी दि.१६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. स.कलम ३१०(२), ३११ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बॅटरी, केबल व स्टीलची केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत दि.२९.०८.२०२५ रोजी शिंगोली ते उपळा पाटी ब्रीज च्या समोरील नवीन रेल्वे चे काम चालु असलेल्या ठिकाणी धाराशिव येथील अल्ट्रानेटर, डी.जी.बॅटरी, केबल वायर व स्टिल असा एकुण ७०,०००-किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी दशरथ भगवान पाटील, वय ३० वर्षे, व्यावसाय नोकरी रा. शिंदी ता. भडगाव जि. लळगाव ह.मु. आयएससी प्रोजेक्ट वरुडा रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.१६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## शेंगदाणा पेंड चार पोते, सुग्रासचारा पोते, तुरकलना चार पोते चोरीस गेले: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रोहण मधुकर मोरे, वय २८ वर्षे, रा. वडगाव सि ह.मु. गणेश नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे पशुखाद्य ट्रेडर्स तुळजापूर नाका गणेश नगर धाराशिव येथील दुकानाचे शेटर सुनिल वय ३२ रा. जुना बस डेपो धाराशिव ता. जि. धाराशिव इतर दोन इसमांनी दि.१८.१०.२०२५ रोजी सु.तोडून आत प्रवेश करुन शेंगदाणा पेंड चार पोते, सुग्रासचारा पोते, तुरकलना चार पोते असा एकुण २०,४०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोहण मोरे यांनी दि.१९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(४), ३०५, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## मोटरसायकल, बोकड व मोबाईलची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राम पापय्या बेटपली, रा.देवसिंगा नळ गायरान वस्ती ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची मोटरसायकल एक काळ्या रंगाचा बोकड,मोबाईल फोन असा एकुण ४१,००० किंमतीचा माल हा अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. राम बेटपाली यांनी दि.१९.१०.२ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## शाहु नगर येथील नालंदा बौद्ध विहारात वर्षावास समाप्तीचा कार्यक्रम संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)-- वर्षावास समाप्तीचा कार्यक्रम शाहु नगर येथील नालंदा बौद्ध विहारात पुज्यणीय भिक्खुणी मेत्ताजी आर्या,बुध्द सृष्टी कळंब यांच्या उपस्थितीत धम्मदेसना देऊन संपन्न झाला,तिन महिन्यात वर्षावास निमित्ताने नालंदा बौद्ध विहारात महिला भगिनींनी बौद्ध धम्माच्या प्रचार व प्रसार करीता बुध्द वंदना,वाचन करण्यात आले,कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली,पुज्यणीय भिक्खूणी मेत्ताजी आर्या यांनी धम्मदेसना दिली,भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समितीच्या वतीने बलभीम कांबळे यांनी संविधान उद्देशिका व विश्लेषण प्रत वाटप करण्यात आल्या,मान्यवरांचा सत्कार करण्यात आला,भोजन दान देण्यात आले,यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या शिलाताई चंदनशिवे,विजयमाला धावारे, काजल गायकवाड,मिरा शिंदे,कल्पना कांबळे, संगिता नागटिळक,शिलाताई पवार, संगिता वावळकर,शोभा चंदनशिवे, नंदा कांबळे, अनिता ठोकळ, आशा गायकवाड ,सुलेखा घरबुडवे,ॲड.अनुरथ नागटिळक, नागनाथ गोरसे, प्रा.रवि सुरवसे, बलभीम कांबळे, संपतराव शिंदे,रमेश कांबळे, बापु कुचेकर, गणेश वाघमारे,बापु धावारे, आनंद घाडगे, बाळासाहेब माने,सह इतर उपस्थित होते.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# दिवाळीचा सण आनंदाने साजरा करा

दिवाळीचा सण सर्वांनी आनंदाने सर्वांनी साजरा केला पाहिजे. वर्षातून एकदा येणारा सण सर्वजनच साजरा करतात. विविधेतून एकात्मता केवळ भारतात दिसते. सण म्हटले की, आनंद निर्माण होणारा, एकमेकाविषयी प्रेमाची भावना! तसे सण एकटे साजरा करण्यात काहीच मजा नाही. अनेकजन एकत्र मिळून सण साजरे करण्यात जी मजा आहे ती ईतर कोणत्याही बाबीत मिळत नाही. घरात जर वयोवृद्ध व्यक्ती असेल तर आनंदच वेगळा अनुभवास येतो. घरातील वयोवृद्ध सतत मार्गदर्शन करीत असतात त्यामुळे चुकीचा निर्णय घेतला जाऊ शकत नाही. दिवाळीच्या सणात अनेकजन बाहेरगावाहून गावी येतात. सर्वजन एकत्र येऊन सण साजरा केला जातो. केवळ आणि केवळ प्रेमाची भावना यावेळी निर्माण होते. दिवाळीचा सण गरीबापासून श्रीमंतापर्यंत साजरे करतात. सणाचे महत्त्व कमी होत आहे. ही वस्तूस्थिती असली तरी अजून भारतीय सण लोप पावले नाहीत. पारंपारीक पद्धतीने साजरे होणारे सण भारतीयच चांगल्या प्रकारे साजरे करतात. त्यामुळे कौटुंबिक जिव्हाळा हा आपल्याच देशात दिसून येतो. दिवाळी सणाच्यावेळी पुर्ण कुटुंब एकत्र येतात, गोडाचे पदार्थ बनवुन आनंदाने खातात. लहानापासून मोठ्या पर्यंत यात सहभाग नोंदविला जातो. सणात कितीही महागाई वाढली तरी कमी-अधिक प्रमाणात खरेदी केली जातेच व सण साजरा केला जातो. यावर्षी दिवाळीच्या आनंदास निसर्गाने विरझन घातले आहे. सर्व काही आनंदात असताना सप्टेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. एवढा पाऊस झाला की, शेतीत आहे तेवढे हीरावुन घेतले. शेतातील पिक नष्ट झाले. पावसाने जमीनीची माती वाहून गेली. सतत पडणाऱ्या पावसाने राणात गुडघ्याएवढे पाणी साचले. अजून ही राणात पाणी आहे. शेतातील सोयाबिन आडवे झाल्याने मोड फुटत आहेत. अशी भयाण स्थिती असताना शेतकरी दिवाळीचा सण आनंदाने साजरा करीत आहेत. त्यांनी नुकसान भरपाई सणाच्या अगोदर मिळावी म्हणून आंदोलन केले नाही. असहकार चळवळ केली नाही. नुकसान भरपाई खात्यावर टाकली का नाही ते न पहाता थेट दिवाळीचा आनंद घेत आहेत. सरकार सतत मदत करते. संकटाच्यावेळी धाऊन येते. यादिवाळीच्यावेळी मात्र आखडता हात का घेतला हे कळून येत नाही. राज्यात राज्यकर्ते तसे शेतकरी कुटुंबातील आहेत. अनेकांच्या घरी अनेक एकर शेती आहे. अशांनी आपल्याच कुटुंबातील शेतकरी असल्याची आठवण ठेवणे अपेक्षित असते. तसे झाले नाही. घरात जी काही तुटपुंजी मडक्यात जमवली रक्कम होती ती फोडून सण साजरा करीत आहेत. तरी दुःख व्यक्त करीत नाहीत. काही झाले तरी दुःख चेहऱ्यावर दिसत नाही तर आनंदाने सण साजरा करीत आहेत. मुळात दिवाळीचा सण हा वर्षातील सर्वात मोठा सण आहे. याची आठवण ठेवून राज्य सरकारने भरीव मदतीचा हात पुढे केला पाहिजे. वास्तविक दिवाळीचे महत्त्व वेगळे आहे. दिवाळीचा सण किमान पाच दिवस साजरा केला जातो. भाऊबीज नंतर संपतो. नंतर जवळपास सहा महिणे सण नसतात. त्यामुळे दिवाळीचा सण मोठा वर्षातील अखेरचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. दिवाळीत लक्ष्मी पुजा असते. त्या बरोबर उद्योग-धंद्यात देखिल प्रगती व्हावी म्हणून पुजा करतात. दिवाळी ते गत दिवाळी या एका वर्षात किती कमाई झाली, नुकसान किती झाले. नुकसान झाले तर कोणती चुक झाली ती सुधारण्याचा विचार करायाला लवाणारा सण आहे. व्यापारी एका वर्षात काय साध्य केले व आगामी वर्षात काय करणार याची आखणी यावेळी करतात. नवीन व्यावसायाची उभारणी केली जाते. त्याच प्रमाणे नव-नवीन व्यावसायत कोणती प्रगती करावयाची या बाबत चिंतनाचा सण आहे. त्यामुळे दिवाळीच्या सणाचे महत्व वेगळेच आहे. हिंदु समाज काय सर्व समाज हा सण साजरा करतात. जैन समाज सुद्धा महत्त्व देतो. मुळात या सणाच्यापुर्व काही दिवस शेतकऱ्यावर निसर्गाचे संकट आले. यावर एकटा शेतकरीच मात करीत आहे. सरकारने म्हणावी तशी मदत केली नाही. सरकारने तातडीने मदत केली असती तर शेतकऱ्याने तातडीने मदतीचा पैसा बाजारात खर्च केला असता. पैसा खर्च करणारा एकमेव असा देशात शेतकरी बांधव आहे हे लक्षात घेतले पाहिजे. बाकी खर्च करण्यात मागे आहेत. त्यामुळे सरकारने मदतीचा हात ढिला सोडला असता तर सदरील पैसा बाजारात फिरला असता. सर्वांचीच दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाली असती. काही झाले तरी शेतकरी बांधवाने संकटावर मात करीत दिवाळी साजरी करीत आहे ही मोठी आनंदाची बाब आहे. दिवाळीच्या सणाच्यापुर्वी सरकारने जीएसटीमध्ये कपात केली. काही बाबी जीएसटीतून वगळल्या आहेत. तर काही वस्तूची जीएसटी कमी केली आहे याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. तरी काही व्यापारी वर्गांनी जीएसटी सवलतीची घोषणा करण्यापुर्वी खरेदी केली आहे. त्यामुळे काही बाबी स्वस्त दिसून आल्या नाहीत. त्यांनी सर्रास सांगितले की, पुर्वीची जुनी खरेदी असल्याने आम्ही दर कमी शकत नाही. जसे फटक आदि वस्तू! फटाके हे सहामहिण्यापुर्वीच तयार कराव्या लागतात. त्यावेळी एसएसटी अधिक होती हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे काही बाब महाग मिळाल्यातरी खरेदीदरांनी त्या खरेदी केल्या आहेत. सरकारसुद्धा आपल्या परिने काही बाबी दिवाळीच्यासणापुर्वी चांगला निर्णय घेतला आहे. सिमेंटचे दर कमी केले तरी बाजारात म्हणावी तेवढी किंमत कमी झाली नाही ही वस्तूस्थिती दिसून येते. काही झाले तरी दिवाळीचा सण सर्वांनी आनंदाने खर्चात काटकसर करून साजरा करीत आहेत. खाण्याचे म्हणजे तेलाचे दर कमी झाले. तसे भाजीपाल्याची आवक नाही. पावसात भाजीपाल नष्ट झाला. त्यामुळें भाजीपालाच्या किंमती वाढीव आहे. दिवाळीचा सणानंतर लवकर मोठा सण नाही म्हणून प्रत्येकांनी सण उत्साहात साजरा करीत केल्या जातात. केवळ शेतकऱ्यास सरकारने भरीव मदत करणे अपेक्षित होते ते केले नाही एवढीच उणीव दिसून आली. बाकी आनंदाने सण साजरा होत आहे ही आनंदाची बाब आहे.

# भाऊबीज प्रेम, भक्ती आणि नात्यांच्या प्रकाशाचा उत्सव

भारतीय संस्कृती, परंपरा आणि नात्यांमधील गोडवा जपणारा दिवाळीतील शेवटचा आणि अत्यंत महत्त्वाचा सण म्हणजे भाऊबीज (यमद्वितीया). कार्तिक शुद्ध द्वितीयेला साजरा होणारा हा दिवस केवळ एक धार्मिक विधी नाही, तर बहीण-भावाच्या पवित्र नात्यातील मूक प्रेमाची आणि अतूट विश्वासाची उजळण करणारा भावनोत्कट उत्सव आहे. भाऊबीज हा केवळ सण नाही, तर ती एक भावना आहे बहिणीच्या दीर्घायुष्याच्या प्रार्थनेचा आणि भावाच्या संरक्षणाच्या वचनाचा.




त्या एका क्षणी, बहिणीच्या डोळ्यांत भक्ती होती, आणि भावाच्या कपाळावर विश्वासाचा उजेड... संध्याकाळी मंद वारा वाहत होता, दिवाळीच्या दिव्यांचा लुकलुकता झगमगाट आकाशात चमकत होता. घराच्या अंगणात रांगोळीच्या आरासीत ओवाळणीची थाळी ठेवलेली हळदीचा रंग, कुंकवाची शालीन लाली आणि बाजूला राहिलेला दिवा, त्यांच्या नात्याचा शाश्वत साक्षी.

भाऊबीज हा केवळ सण नाही, तर भावनेचा दीप आहे. बहिणीच्या हृदयातून निघालेली प्रत्येक प्रार्थना आणि भावाच्या मनी जागलेली प्रत्येक कृतज्ञता, या सणाच्या ज्योतीला प्राण देतात. थाळीतील एक एक घटक दिवा, तांदूळ, फुलं, मिठाई हे सर्व नुसते साहित्य नसतं, तर भावनेच्या कणांनी विणलेलं एक प्रेमाचं विश्व असतं. ''थाळीतील प्रकाश जसा भावाच्या कपाळावर उजळतो, तसाच बहिणीच्या मनात समाधानाचा चंद्र उगवतो.''

प्रेमाचा सुवर्ण धागा

भाऊबीज म्हणजे मायेचा सुवर्णधागा जो वेळ, अंतर, भाषेच्या सिमांना पार करून हृदयांना जोडतो. त्या क्षणी बहीण भावाला ओवाळते, आणि तिच्या ओठांवरून उसळलेला प्रत्येक शब्द म्हणजे प्रार्थना. तिच्या हातातली थाळी त्यागाचं, नात्याचं, काळजीचं प्रतीक असतं. आणि भाऊ, तिचं औक्षण घेतो तेव्हा त्याच्या मनात एक मौन वचन जन्म घेतं ''कधीच तुला दुःखाची सावली स्पर्शू देणार नाही.'' सोनेचांदीच्या भेटीपेक्षा बहीण भावाला देते ती अमूल्य ओवाळणी म्हणजे तिची श्रद्धा. आणि भाऊ तिला देतो ते निखळ आश्वासन ''मी आहे तुझ्या प्रत्येक प्रार्थनेत.''

पौराणिक प्रेमकथा यम आणि यमुना

ही भावना केवळ मानवी नाही; देवतांनाही स्पर्शून गेलेली आहे. मृत्यूचा अधिपती यम आपल्या बहीण यमुनेकडे एका दिवशी आला, आणि तिच्या प्रेमाच्या अर्पणाने तोही मृदू झाला. तिच्या जेवणाच्या आग्रहात, तिच्या आशीर्वादाच्या हातात जी आत्मीयता होती, ती इतकी दिव्य होती की मृत्यूवरही प्रेमाचं सामर्थ्य विजय मिळवतं. म्हणूनच हा दिवस 'यमद्वितीया' म्हणून ओळखला जातो मृत्यूच्या भीतीवर मात करणाऱ्या स्नेहाचा प्रतीक.

यमदेवाने त्या वेळी दिलेला वर असा होता की, ''या दिवशी जी बहीण आपल्या भावाला औक्षण करेल, तिला मी कधीच भय देणार नाही.'' किती गूढ, किती सुंदर! सत्याच्या, श्रद्धेच्या, आणि प्रेमाच्या संगमाचं हे सर्वात नितांत रूप.

संस्कृती आणि कुटुंबबंध

भारतीय घरात भाऊबीज म्हणजे केवळ विधी नाही, तर नात्यांचं पुनर्जन्म आहे. सासरी गेलेली बहीण त्या दिवशी माहेरी येते, आईच्या कुशीत विसावते, आणि बालपणीच्या आठवणी पुन्हा जिवंत होतात. घरातले हास्य, बोलघेवडे संवाद, आणि ओवाळणीच्या आरतीतून उमटणारा प्रेमगंध हे सर्व मिळून एका भारतीय घरातील सर्वांत सुंदर दृश्य तयार होतं. ''भाऊबीज म्हणजे केवळ थाळीतला दिवा नाही, ती म्हणजे नात्यांतील प्रकाश.''

या सणातून आपल्या संस्कृतीतील 'संस्कार, सन्मान आणि आत्मीयते'चा गंध दरवळतो. प्रत्येक कुटुंबात या दिवशी ओवाळणीसह दिले जाणारे आशीर्वाद म्हणजे जीवनाचा अर्थ शिकवणारे संस्कार असतात.

स्त्रीशक्ती आणि देवीत्व

शास्त्र सांगतं, भाऊबीजेच्या दिवशी स्त्रियांमध्ये देवीतत्त्व प्रकट होतं. ज्यांच्या हातात थाळी आहे, त्यांच्या मनात शक्तीचा प्रवाह असतो. जेव्हा ती बहिण आपल्या भावाला ओवाळते, तेव्हा तिच्या हातातून केवळ हळदअक्षता नव्हे, तर आशीर्वादाचं तेज झरकते. ती त्याला रक्षण देते विधानाने नव्हे तर भक्तीच्या उर्जेने. स्त्री ही केवळ बहीण नाही, ती स्वतः शक्ती आहे, आणि प्रेमाच्या त्या शक्तीत देवत्व दडलेलं असतं.

नात्यांच्या मर्यादेपलीकडे

कालपरिवर्तनाच्या प्रवाहात भाऊबीजने आपले रूप अधिक व्यापक केलं आहे. आज हा सण देशभर साजरा होतो अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात, जवानांच्या तळांवर. कुठे एकाकी वृद्ध भावाला एखादी तरुणी ओवाळते, कुठे गावातील मुली पोलीस कर्मचाऱ्यांना ओवाळणी देतात. त्या प्रत्येक ओवाळणीतून असतो एकच संदेश ''माणुसकीचं भाऊबहिणपण अधिक मोठं आहे.''

आज प्रत्येक मनाला एक बहीण हवी जी प्रेमाचा दीप लावेल. आणि प्रत्येक बहिणीला असा भाऊ हवा जो अंधारातही वचनाने उजेड देईल.

भाऊबीज म्हणजे केवळ श्रद्धेचा सण नाही, ती साधनेचं प्रतीक आहे. बहिणीची प्रार्थना म्हणजे भक्ती, भावाचं मौन वचन म्हणजे रक्षण आणि या दोघांच्या संगमात निर्माण होतो तेजाचा एक दिव्य किरण. ''भाऊबीज म्हणजे मृत्यूवरही मात करणाऱ्या प्रेमाची प्रार्थना.'' या क्षणी मन माणुसकीला स्पर्श करतं आणि आत्मा आपल्याला शिकवतो प्रेम म्हणजेच अमरत्व.

जग झपाट्याने बदलत असताना, भाऊबीजेचं खरं सौंदर्य नव्या अर्थाने खुलतं ज्ञान, संस्कार आणि विचारांची देणगी म्हणजे खरी ओवाळणी. ज्या हातात पुस्तक असतं, ज्या विचारात प्रार्थना असते, तिथे ही संस्कृती चिरंतन राहते. म्हणूनच म्हणावंसं वाटतं ''भाऊबीजेच्या थाळीत आज संस्काराची ज्योत पेटवू हीच खरी भारतीयतेची ओवाळणी ठरेल.''

ओवाळणीतील दिवा मंदावत जातो, पण त्या प्रकाशाचा झगमगता स्पर्श कायम राहतो. भावाच्या कपाळावरचा तिलक केवळ चिन्ह नसून, ती बहिणीच्या प्रेमाचं आश्वासन आहे. आणि या भावनिक अखंडतेतच भाऊबीजेचं खरं सौंदर्य दडलेलं आहे नात्यांचं, संस्कृतीचं आणि मानवतेचं.

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

# कराड कुटूंबियातील तिसऱ्या पिढीने जोपासला समर्थपणे वारसा





**जनहित, लोककल्याणकारी अशा विविध वैचारिक आणि चांगल्या विचाराच्या व्यक्तीच्या सहवासात आल्यास निश्चितपणे आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळते. परिसाच्या सहवासात लोखंड आले तरी त्या लोखंडाचे भाग्य उजळून निघते. असाच प्रत्यय शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकिय, सामाजिक आणि अध्यात्मिक या चारही क्षेत्रात मोठे योगदान असलेले विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासात आल्याने अनेकांच्या जीवनाची रेखाच बदलून गेली.**

प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचे कार्यकर्तृत्व तासन तास सांगितले तरीही वेळ अपुरा पडेल. कितीही लिहिले तरी कागद कमी पडतील एवढे मोठे कार्य आहे. त्यांच्या भगीनी पूर्णब्रम्हयोगीनी त्यागमुर्ती प्रयागआक्का कराड यांच्या शिकवणीतून जे काही करायचे त्यात इतरांना आधार मिळाला पाहिजे, लोककल्याणाचे कार्य घडले पाहिजे या विचारातून त्यांनी रामेश्वर (रूई) पासून ते संपूर्ण देशभर काम केले. आपल्या निस्वार्थी कार्यपद्धतीने स्वतःचा वेगळा ठसा निर्माण केला. विविध क्षेत्रात दीपस्तंभ प्रमाणे कार्य करणारे प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासातून, प्रेरणेतून अनेकांना नवी दिशा मिळाली. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यासह जेष्ठ बंधू वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांनीही प्रयागआक्कांच्या सामाजीक कार्याचा माध्यमातून साखर कारखाना उभा केला. कारखान्याचे चेअरमन श्री. राजेशजी कराड यांनी बारकाईने स्वतःहा लक्ष देवून अत्यंत काटकसरीने नियोजन करून या कारखान्याची उभारणी केली. विजयादशमीच्या दिवशी ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ केला तेंव्हापासून आज तागायत शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा अखंड यज्ञ सुरू आहे हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खूप दिलासादायक आहे.





साखर कारखाना सुरू झाल्याने स्वतःच्या पोटची खळगी भरण्यासाठी विविध स्वप्न उराशी बाळगून अनेक ऊस तोड कामगाराचे कुटुंब ऊसाच्या फडात ऊस तोडणीच्या कामाला लागले आहेत. जगण्यासाठी काम केल्याशिवाय पर्याय नाही त्याशिवाय लेकरा बाळांचे हित होणार नाही या भावनेतून कामाला आलेल्या ऊसतोड कामगाराच्या जीवनात दिवाळी सण काय? दिवाळी ऊसाच्याच फडात, ईतराप्रमाणे त्यांना सुट्टी नसते, नवे कपडे तर दूरच, गोड धोड करून खाने अवघडच.....

कराड कुटुंबीयात सुन म्हणून आलेल्या सौ. शुभांगी राजेशजी कराड यांनी प्रयागआक्का यांच्याकडून अखंड अन्नदानाचा मिळालेला वारसा आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना दिवाळीत दिवाळीचा अल्पसा का होईना आनंद देता यावा यासाठी ऊसतोड कामगारांना ज्या ठिकाणी काम सुरू आहे अशा ऊसाच्या फडात जाऊन प्रत्येक कुटुंबीयांना पुरेल एवढा दिवाळीचा फराळ देण्याची संकल्पना मनात आणली. आणि त्या दृष्टीने फराळ तयार करणे असेल त्याची पॅकिंग असेल ही कामे लागलीच आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेवून झपाट्याने त्या करू लागल्या.

ऐन दिवाळीत सणाची लगबग असतानाही श्रीसंत गोपाळबूवा महाराज शुगर अँड अँग्रो इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील ऊस तोडणीच्या कामावर असलेल्या त्या त्या गाव शिवारातील ऊसाच्या फडावर जाऊन कारखान्याचे मुख्य प्रर्वतक हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, सौ. शुभांगीताई राजेश कराड, रणवीर कराड, बन्सीभाऊ भिसे, गोपाळ पाटील, शाम वाघमारे यांच्यासह इतर अनेककांनी ऊस तोड महिला पूरूष कामगारांची भेट घेवून अस्थेवाइक पणे संवाद साधून चर्चा केली आणि प्रत्येक व्यक्तीस चारकप्याच्या भल्यामोठया स्टीलच्या पॅकिंग केलेल्या डब्बयातून मिठाइचे वाटप केले. सदरील मिठाई मिळताच ऊस तोड कामगारा बरोबराच त्यांच्या सोबत असलेल्या लहान बालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. शिवाय पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या ऊस तोड कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करत असताना सौ. शुभांगीताई कराड यांनाही आत्मिक समाधान मिळत असल्याचे दिसून येत होते.



त्यागमुर्ती प्रयागआक्का कराड आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांच्याकडून ज्यांचा सण ऊसाच्या फडात, कष्ट करण्यात असतो अशा कुटुंबीयांना दिवाळीचा आनंदही देता यावा ही प्रेरणा सौ. शुभांगीताई राजेश कराड यांच्या मनात यावी यातच खूप काही आहे. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यामुळे कराड कुटुंबीयातील आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने आवडीनुसार दरवर्षी होणारे उत्सव - सण विविध उपक्रमासह सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक कार्य करीत आहेत. आध्यात्मिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वारकरी सांप्रदाय वाढविण्यासाठी रमेशआप्पांनी शेकडो भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केले. प्रयागआक्का यांच्याकडून मिळालेला समाजहिताचा वारसा प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांनी पुढच्या पिढीला दिला आणि कराड कुंटूबातील तिसऱ्या पिढीनेही तेवढ्याच सक्षमपणे पुढे चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. खरंच कराड कुटुंबीयांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. शुभांगी वहिणीच्या ऊसतोड कामगारांना दिलासा देणाऱ्या दिवाळी कार्यक्रमाच्या निमित्ताने कराड कुटुंबीयांच्या हातून सतत समाज हिताची कार्य घडावीत हीच परमेश्वरचरणी प्रार्थना...

**-चंद्रकांत कातळे,**
**रेणापूर**

# लक्ष्मीपूजन: धन, समृद्धी आणि ऐश्वर्याचे स्वागत!

मुंबई : लक्ष्मीपूजन हा हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे, जो दिवाळीच्या पाच दिवसांच्या उत्सवातील मुख्य दिवस मानला जातो. हा सण दरवर्षी आश्विन महिन्यातील अमावास्येला (दिवाळीचा मुख्य दिवस) संध्याकाळी साजरा केला जातो. या दिवशी स्थिर धन, समृद्धी आणि ऐश्वर्य यांची देवी माता लक्ष्मी, बुद्धी व शुभ-लाभ देणारे श्री गणेश आणि धनाचे रक्षण करणारे देव कुबेर यांची विधिवत पूजा केली जाते.



लक्ष्मीपूजनाचे महत्त्व

लक्ष्मीपूजन केवळ पैसा किंवा संपत्ती मिळवण्यासाठी केले जात नाही, तर ते स्थिर धन, आरोग्य, यश, ऐश्वर्य आणि मानसिक शांती प्राप्त करण्यासाठी केले जाते.अशी धार्मिक श्रद्धा आहे की, दिवाळीच्या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर संचार करते आणि जे भक्त आपले घर स्वच्छ ठेवून, दिव्यांची रोषणाई करून तिचे स्वागत करतात, त्यांच्या घरी ती स्थिर (कायमस्वरूपी) स्वरूपात वास करते.लक्ष्मीसोबत बुद्धीचे देवता श्री गणेश यांची पूजा केल्याने व्यक्तीला बुद्धी आणि शुभ-लाभ प्राप्त होतात. तसेच, धनाचे रक्षक असलेल्या कुबेर देवांची पूजा केल्याने धनाचे रक्षण होते आणि ते योग्य मार्गाने वापरले जाते. घरात लावले जाणारे दिवे (पणत्या) हे अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहेत, ज्यामुळे घरातून दारिद्र्य आणि नकारात्मकता दूर होते.या दिवशी केरसुणीचे (झाडूचे) पूजन केले जाते, कारण केरसुणी घरातून दारिद्र्य आणि अलक्ष्मी (नकारात्मक ऊर्जा) घालवून टाकते, म्हणून तिला देवीस्वरूप मानले जाते. व्यापारी वर्ग या दिवशी नवीन खातेवह्या (चोपडा) किंवा जमा-खर्चाच्या वह्यांची पूजा करून त्यांच्या व्यवसायात वृद्धीसाठी लक्ष्मीला प्रार्थना करतात.

शुभ मुहूर्त आणि पूजाविधी

यंदा लक्ष्मीपूजन प्रदोष काळात (सूर्यास्तानंतर) करणे अत्यंत शुभ मानले जात आहे. ज्योतिष तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ६ वाजून १० मिनिटांपासून ते रात्री ८ वाजून ४० मिनिटांपर्यंत पूजेसाठी उत्तम शुभ मुहूर्त आहे. या स्थिर मुहूर्तावर लक्ष्मीचे पूजन केल्यास घरात स्थिर लक्ष्मीचा वास होतो, अशी श्रद्धा आहे.

पूजेचा विशेष विधी

घरोघरी आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये आज सायंकाळी स्वच्छता करून, रांगोळ्या काढून दिव्यांची रोषणाई केली जाते. देवी लक्ष्मी आणि गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पंचोपचार किंवा षोडशोपचार पूजा केली जाते.पूजा करताना धन, संपत्ती, नवीन खातेवह्या (चोपडा) आणि सोन्या-चांदीचे दागिने यांची पूजा करावी.

लक्ष्मीपूजन हा दिवस व्यापारी वर्गासाठी नवीन आर्थिक वर्षाचा प्रारंभ मानला जातो. या दिवशी नवीन खातेवह्यांची (चोपडा पूजन) पूजा करून पुढील वर्षभर व्यवसायात भरभराट व्हावी यासाठी प्रार्थना केली जाते.

आजच्या या मंगलमय दिवशी प्रत्येक घरात सुख, समृद्धी, आरोग्य आणि ऐश्वर्य नांदावे यासाठी माता लक्ष्मीला प्रार्थना करावी.

आरतीनंतर हात जोडून माता लक्ष्मीला घरात दीर्घकाळ निवास करण्याची प्रार्थना करावी आणि पूजेत काही चूक झाली असल्यास क्षमा मागावी. रात्री संपूर्ण घरात पणत्यांची रोषणाई करावी.सर्वांना लक्ष्मीपूजनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# रोज फिश ऑइल सप्लिमेंट्स घेताय? आधी हे वाचा !

मुंबई : सध्या निरोगी जीवनशैलीकडे झुकणाऱ्या अनेक लोकांचा कल हेल्दी डाएट, योगा, व्यायाम, आणि विविध सप्लिमेंट्सकडे वाढताना दिसतो आहे. त्यात 'फिश ऑइल सप्लिमेंट्स' हे एक मोठं नाव बनलं आहे. शरीरातील ओमेगा-३ फॅटी ॲसिडच्या गरजेसाठी हे सप्लिमेंट खूपच लोकप्रिय झालं आहे. मात्र, अलीकडील संशोधनानुसार, हे सप्लिमेंट सर्वांसाठी सुरक्षित आहेच असं नाही.

फिश ऑइल - फायदेशीर की हानिकारक?

फिश ऑइलमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड हृदयासाठी फायदेशीर मानले जातात. रक्तदाब कमी करणे, कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवणे, आणि हृदयाच्या आरोग्यास मदत करणे, असे याचे फायदे सांगितले जातात. मात्र, अलीकडील अभ्यासांतून हे स्पष्ट होत आहे की कोणताही पूर्वीचा हृदयविकार नसलेल्या लोकांसाठी या सप्लिमेंट्सचा वापर उलट त्रासदायक ठरू शकतो.

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, फिश ऑइल सप्लिमेंट्स घेणाऱ्या अशा व्यक्तींमध्ये - ज्यांना हृदयाशी संबंधित कोणताही आजार नव्हता - ट्रियल फायब्रिलेशनचा धोका सुमारे १३% वाढला आणि स्ट्रोकचा धोका ५% ने वाढलेला आढळला. विशेषतः महिलांमध्ये हा त्रास जास्त दिसून येतो.



दुसऱ्या बाजूला, हेच सप्लिमेंट्स हृदयविकाराच्या रुग्णांसाठी काही प्रमाणात फायदेशीर ठरते. तज्ज्ञांकडून सांगण्यात आलं की अशा रुग्णांमध्ये ट्रियल फायब्रिलेशनचा झटका गंभीर स्वरूप धारण करण्याचा धोका १५% ने कमी झाला. तसेच हृदयविकारामुळे मृत्यू होण्याची शक्यता सुमारे ९% ने घटली.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय सप्लिमेंट घेणे टाळा

कोणतीही अन्नपूरक गोळी, ती नैसर्गिक असली तरीही, प्रत्येकासाठी योग्यच असेल असे नाही. शरीरात ओमेगा-३ ची कमतरता असेल आणि आहारातून ती भरून न निघाल्यास वैद्यकीय सल्ल्यानेच फिश ऑइल सप्लिमेंट्सचा वापर करावा. संपूर्णपणे निरोगी व्यक्तींनी फक्त प्रिव्हेंटिव्ह उपाय म्हणून फिश ऑइल सप्लिमेंट्स घेणे टाळावे. त्याऐवजी, ओमेगा-३ मिळवण्यासाठी नैसर्गिक स्रोत जसे की अक्रोड, जवसाचे बी, किंवा मासे यांचा यांचा आहारात समावेश करणे अधिक सुरक्षित ठरू शकते.

कोणतेही सप्लिमेंट घेण्यापूर्वी वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, विशेषतः जेव्हा त्याचा आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

# दीपोत्सव व्हावा प्रदूषणमुक्त



दिवाळी हा आनंद घेण्याचा आणि इतरांना आनंद देण्याचा सण आहे. तो प्रकाशाचा उत्सव आहे. फटाके उडवून तो मिळतो असे नाही. गरीब-गरजूंना काही देऊन त्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करता येईल. नरक चतुर्दशीच्या अभ्यंग स्नानाने आज दिवाळीच्या सणास प्रारंभ होत आहे. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे. अंधारावर प्रकाशाने केलेली मात हे त्या मागचे सूत्र आहे; मात्र यंदाची दिवाळी हवेच्या प्रदूषणामुळे धुरकट होण्याचा इशारा 'भारतीय विषुववृत्तीय हवामान विभागा'ने दिला आहे. ही चिंतेची बाब आहे. पुण्यासह मुंबई, दिल्ली, कोलकाता, बंगळुरु, अहमदाबाद, हैदराबाद आदी शहरांमध्ये दिवाळीच्या काळात प्रदूषण वाढण्याचा धोका या संस्थेने वर्तवला आहे. हवेचे प्रदूषण दि.२१ रोजी सर्वाधिक असेल असे भाकितही 'आय आय टीएम'ने वर्तवले आहे. हवेतील सूक्ष्म प्रदूषणकारी कणांचे पीएम २.५- प्रमाण दिवाळीत वाढणार असल्याचा संस्थेचा अंदाज आहे. याचे कारण आपण दिवाळी 'साजरी' करत असल्याच्या पद्धतीत आहे. जगातील सर्वात जास्त प्रदूषित शहरांची संख्या भारतात सर्वात जास्त आहे, हे या आधी अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहेच. दिवाळीत या शहरांतील प्रदूषण अधिक धोकादायक पातळीपर्यंत जाण्याची चिन्हे आहेत. दिवाळीत फटाके उडवले जातात, भुईनळे व अन्य आतषबाजी केली जाते. त्यातून प्रचंड प्रमाणात धूर बाहेर पडतो आणि माणसे, पशु-पक्षी यांचा श्वास कोंडतो हे यापूर्वी अनेकवर्षे आपण अनुभवले आहे. या वर्षी पुन्हा एकदा तोच धोका समोर उभा आहे.

'देण्यातून' आनंद मिळवा

पावसाळा संपून हिवाळा सुरु होण्याच्या काळात दिल्लीचे हवेचे प्रदूषण दर वर्षी वाढते. शेजारच्या हरयानात शेतातील तण जाळण्याच्या प्रथेमुळे हे घडते. दिल्लीच्या हवेतील प्रदूषणकारी कणांची पातळी गेल्या आठवड्यातच १४० पर्यंत पोचली. दिल्लीचा हवेच्या दर्जाचा निर्देशांक-एअर क्वॉलिटी इंडेक्स- येत्या दोन दिवसांत ४०० पर्यंत पोचू शकतो, असा 'आय आय टीएम'चा अंदाज आहे. पुणे, मुंबई, हैदराबादमध्ये तण जाळले जात नसले तरी कारखाने वाहने यांची अनियंत्रित संख्या प्रदूषण निर्माण करते हे सर्वज्ञात आहे. दिवाळी सुरु होताच सर्वत्र फटाके उडवले जातात. लक्ष्मीपूजनास हिंदी भाषक पट्ट्यात 'दिवाळी' असे संबोधले जाते. या दिवशी फटाके उडवण्याचे, आतषबाजीचे प्रमाण सर्वाधिक असते. लाखो टन धूर व प्रदूषणकारी कण त्यातून निर्माण होतात. साहजिकच हवेचा दर्जा 'वाईट'पासून 'अति वाईट'पर्यंत घसरतो. येत्या दोन दिवसांत देशाच्या बहुतेक भागात हे घडणार आहे. वैज्ञानिक, सामाजिक संस्था, न्यायालये, सरकार यांनी सतत आवाहन करूनही फटाके उडवण्याचे प्रमाण घटलेले नाही. भरपूर फटाके उडवून पैशाचा धूर करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण बनत आहे ही दुर्दैवाची बाब आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रचंड प्रमाणात फटाके उडवले जातात, त्यामागचे हे मुख्य कारण आहे. फटाक्याचा स्फोट झाल्यावर किंवा भुईनळा जळाल्यावर केवळ प्रदूषणकारी कण बाहेर पडतात असे नाही, तर घातक वायूही हवेत मिसळतात. या वर्षी दिल्लीत काही अटींवर 'हरित फटाके' उडवण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत हरित फटाक्यांमधून प्रदूषणकारी कण व वायू कमी बाहेर पडतात; पण ते पूर्ण प्रदूषणमुक्त नसतात हे लक्षात ठेवले पाहिजे. भारताची फटाक्यांची बाजारपेठ सुमारे ६ हजार कोटी रुपयांची आहे, हा अंदाज आहे. प्रत्यक्षात ही रक्कम बरीच जास्त असू शकते. दक्षिणेतील दोन-तीन राज्यांत फटाके व शोभेची दारू बनवणारे कारखाने आहेत. जर फटाके उडवणे थांबवले, तर त्या कारखान्यांत काम करणार्या मजुरांचा रोजगार नष्ट होईल, असा एक युक्तीवाद केला जातो. रोजगाराची नवी साधने त्यांना पुरवणे हा त्यावरचा उपाय आहे. फटाक्यांवरील खर्च वाचवून ते पैसे अनाथ, अंध, कर्णबधिर, वाचाहीन व्यक्तींच्या मदतीसाठी वापरले, गरजू मुला-मुलींच्या शिक्षणास मदत केली, निराधार वृद्धांना त्यातून आधार दिला, तर असंख्य वंचित व्यक्तींच्या जीवनात आपण आनंद निर्माण करू शकतो, त्यांनाही दिवाळीचा अनुभव देऊ शकतो हे समाजाने समजून घेण्याची गरज आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करून अनेकांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याची जबाबदारी समाजाची आहे.



## मुलांना चांदीच्या भांड्यात जेवू घाला, फायदे जाणून व्हाल हैराण.... डॉक्टर टीप्स





### हेल्थ टिप्स

जेवणातून शरीरात जातात आणि त्यामुळे मुलांची रोग प्रतिरोधक शक्ती सुदृढ होते आणि मुलं निरोगी राहतात.

४ वात- कफाचा त्रास कमी होतो :

सततच्या पित्त दोषांच्या त्रासामुळे लहान मुलांना नेहमीच सर्दी पाडसाच्या त्रास होतो. चांदी वापरल्याने मुलांना या त्रासांपासून मुक्ती मिळते.

५ स्मरणशक्तीत वाढ होणे :

जेवणातून चांदीचे कण पोटात गेल्याने मुलांच्या स्मरणशक्तीस वाढण्यास मदत होते आणि ते निरोगी व सुदृढ बनतात.

चांदीच्या पात्रात कोणत्याही वयोगटाच्या लोकांनी जेवणे किंवा पाणी पिणे लाभदायक असते. याने शरीरास तेज येते. हे शरीराचे आरोग्यास लाभप्रद असते.

## विनोद




**शिक्षक : पंचवीस माणसे एका दिवसात एक हौद पाण्याने भरतात. तर तोच हौद एक माणूस किती दिवसांत भरेल.**

**विद्यार्थी : पंचवीस दिवस.**

**शिक्षक : आता तू असाच दुसरा प्रश्न सांग.**

**विद्यार्थी : एक जहाज दहा दिवसांत दुसऱ्या देशात पोहोचते तर दहा जहाजे एक दिवसात पोहोचतील.**

## संदेश

Doctor: aap dariye mat. main hoo na.
Patient: aap rahenge. lekin main rahoonga kya?

## सुविचार

**जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.**

**-सर्वेंटिस**



### संस्कृत सुभाषित

**अनाहूत: प्रविशती अपृष्टो बहु भाषते**
**अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम:।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ३३, श्लोक ४१, महाभारत)**

**अर्थ :** दिवसा झोप घेणे आणि सूर्योदयानंतर निजून राहणे हे आयुष्याला हानिकारक आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. भ्रमर, भुंगा
४. सापकिरडू
७. विसराळू
१०. गरीब, दीन
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. शिक्षा
२९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे एक फळ
४२अ. मोल, भाव
४३. संरक्षक आवरण
४४. दात
४५. पहाऱ्याचे काम
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. मित्र
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. लहान मुलांची गाणी
७०. रजतपदक
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. जबानी
७६. कविवार्य बोरकर यांचे टोपणनाव
७७. सबब, निमित्त

### उभे शब्द

१. टप्प्या टप्प्यानी केलेली प्रवास
२. अलमारी
३. दारूचा एक प्रकार
५. चौक
६. मार्गस्थ
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. काढलेली सुट्टी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. बोचणारे बोल
३६. हस्तलाघव
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपला नसलेला
४२. प्रश्न
४२अ. सौरव गांगुलीचे टोपणनाव
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. मनात हेतू धरून केलेले काम
५३. पारखी,५४. मुलगी
५५. धोबी,
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. नाकातील दागिना
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. हरबरा इ. पिकावरील आंबट द्रव

### आडवे उत्तर

१.मधुकर ४.जनावर ७.विसरभोळा १०.पामर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.सजा २९.मशाल ३२.अजगर ३५.जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४२अ.दाम ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदारी ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.बाकीबाब ७७.कारण

### उभे उत्तर

१.मजल दर मजल २.कपाट ३.रम ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रजा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसर ३३.जग ३४.खरमरीत ३६.हातचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४२अ.दादा ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चमकी ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष ७३.आंब



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### वडा पावचा नाद सोडला, हिटमॅन रोहित तब्बल ११ किलो वजन कमी करत...

मुंबई-रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी



स्वत:ला खूप फिटनेसमध्ये ठेवत आहे. रोहितने पहिल्या एकदिवसीय सामन्यात फक्त ८ धावा केल्या, परंतु मैदानाबाहेर त्याच्या शेपमध्ये आणलेल्या बॉडीची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. रोहितचे लक्ष २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकावर आहे, ज्यासाठी तो सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. रोहितने अंदाजे ११ किलो वजन कमी केले आहे आणि जिममध्ये खडतर प्रशिक्षण घेतले आहे.

७००-८०० रेप्स, दिवसातून तीन तास कसून सराव

या वर्षी कुटुंबाच्या सुट्टीवरून परतल्यानंतर रोहित शर्मा काहीसा जड दिसला, ज्यामुळे चाहते आश्चर्यचकित झाले. टीम इंडियाचे माजी सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्यासोबत घेतलेल्या कठोर प्रशिक्षणामुळे त्याचे शरीर पूर्णपणे बदलले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान अभिषेकने रोहितचा शरीर परिवर्तनाचा प्रवास शेअर केला. अभिषेकने स्पष्ट केले की रोहितने बॉडीबिल्डरसारखा सराव केला, दररोज प्रत्येक स्नायू गटासाठी ७००-८०० रेप्स केले. यासाठी त्याने दिवसातून तीन तास सराव केला. त्याने तीन महिने यावर लक्ष केंद्रित केले. त्यानंतर, त्याने त्याच्या क्रिकेट कौशल्यांवर लक्ष केंद्रित केले. दररोज सुमारे दीड तासाचा सेशन

अभिषेक नायरने जिओहॉटस्टारला सांगितले, ''यामुळे अनेकांना आश्चर्य वाटले असेल. टीम इंडियाचे स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच एड्रियन ले रॉक्स देखील मला शाप देतील.

***

### बिहार निवडणुकीत वैभव सूर्यवंशीची एन्ट्री! मोठी जबाबदारी मिळाल्यानंतर...

दिल्ली-वैभव सूर्यवंशी... अवघ्या १४ वर्षाच्या बिहारच्या या




पठ्ठ्याने २०२५ चा आयपीएल सीझन गाजवला. राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या वैभवने फक्त सात सामने खेळले आणि २५२ धावा फटकावल्या. त्यात एक शतक आणि एक अर्धशतक. त्यामुळे अवघ्या क्रिकेटविश्वाची या कोवळ्या मुलाकडे नजर वळली. त्यानंतर त्याने अंडर-१९ संघात शानदार कामगिरी केली. दरम्यान आता त्याला बिहार निवडणुकीत एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

बिहारचा असलेला वैभव सूर्यवंशी केवळ १४ वर्षाचा असला तरी त्याने क्रिकेटविश्वात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०२५ मध्ये त्याने राजस्थान रॉयल्सकडून आयपीएल पदार्पण केले आणि स्पर्धेच्या इतिहासातील दुसरे सर्वात जलद शतक झळकावले. त्यानंतर अंडर-१९ संघासोबत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यांवर चांगली कामगिरी केली. पुढे रणजी ट्रॉफीत बिहार संघाचा उपकर्णधार बनला आणि आता त्याला बिहार निवडणुकीत एक महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाने बिहार विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्याने लोकांना, विशेषत: तरुणांना मतदानाबाबत जागरूक करण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. यासाठी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याला ''फ्युचर व्होटर आयकॉन'' म्हणून नियुक्त केले आहे.

***

### दुसऱ्या वनडेत मोठा बदल? 'या' स्टार खेळाडूला मिळू शकते संधी!

दिल्ली-भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. दोन्ही



संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाला ७ गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे भारतीय संघ या मालिकेत ०-१ ने पिछाडीवर आहे. या सामन्यात भारतीय फलंदाजांपेक्षा पावसाने जास्त वेळ बॅटिंग केली. पावसामुळे ४ वेळा सामना थांबला. त्यामुळे भारतीय फलंदाजांना सेट होण्याची संधी मिळाली नाही. मालिकेतील दुसरा सामना २३ ऑक्टोबरला होणार आहे. भारतीय संघाला मालिकेत टिकून राहायचं असेल तर हा सामना जिंकण अतिशय महत्वाचं असणार आहे. दरम्यान या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये काही महत्वाचे बदल पाहायला मिळू शकतात.

भारतीय फलंदाजांचा फ्लॉप शो-या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी पदार्पण केलं होतं. पण या दोघांनाही पदार्पणाच्या सामन्यात आपली छाप सोडता आलेली नाही. विराट, रोहित, गिल आणि श्रेयस सारखे प्रमुख फलंदाज स्वस्तात माघारी परतले. ७ महिन्यांनंतर पुनरागमन करत असलेला रोहित अवघ्या ८ धावा करू शकला. तर रोहितला खातंही उघडता आलं नाही. त्यामुळे मालिका जिंकायची असेल तर भारतीय फलंदाजांना दुसऱ्या सामन्यात चांगली कामगिरी करावी लागणार आहे.मालिकेतील दुसरा सामना हा ॲडीलेडच्या मैदानावर रंगणार आहे. या खेळपट्टीवर फिरकी आणि वेगवान गोलंदाजांनाही मदत मिळते. त्यामुळे भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये बदल पाहायला मिळू शकतो.

# सेमीफायनलमध्ये जाणारे ३ संघ ठरले!

## भारत की न्यूझीलंड? चौथं तिकीट कोणाला मिळणार?

**नवी दिल्ली:** आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी कसं अहेत भारत आणि न्यूझीलंड संघासाठी समीकरण? जाणून घ्या.



आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारतीय संघाला इंग्लंडकडून पराभवाचा सामना करावा लागला आहे. रविवारी झालेल्या सामन्यात भारतीय संघाला विजय मिळवण्याची सुवर्णसंधी होती. पण भारतीय संघाच्या हातून थोडक्यात हा सामना थोडक्यात निसटला. भारतीय संघाकडून धावांचा पाठलाग करताना स्मृती मान्धनाने ८८ धावांची खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ७० धावा केल्या. हा सामना जिंकून इंग्लंडने सेमीफायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. मात्र भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांना अजूनही सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी असणार आहे. कसं असेल दोन्ही संघांसाठी समीकरण? जाणून घ्या.

भारतीय संघासाठी कसं असेल समीकरण?

आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेसाठी इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या ३ संघांनी सेमीफायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. आता एका स्थानासाठी २ संघांमध्ये लढत सुरू आहे. भारतीय संघाने सुरुवातीचे २ सामने जिंकले. त्यानंतर पुढील तिन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. जर भारतीय संघाला सेमीफायनलमध्ये प्रवेश करायचा असेल तर पुढील दोन्ही सामन्यांमध्ये विजय मिळवावा लागणार आहे.

भारतीय संघाचे पुढील २ सामने न्यूझीलंड बांगलादेशविरुद्ध होणार आहे. जर भारताने हे दोन्ही सामने जिंकले तर ८ गुणांसह भारतीय संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करू शकतो. पण जर भारतीय संघाला न्यूझीलंडविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला.तर बांगलादेशला पराभूत करूनही भारतीय संघाला न्यूझीलंड विरूद्ध इंग्लंड यांच्यातील सामन्याच्या निकालावर अवलंबून राहावं लागणार आहे. जर इंग्लंडने न्यूझीलंडला पराभूत केलं तर भारतीय संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करेल. पण जर न्यूझीलंडला हरवलं आणि बांगलादेशकडून भारताचा पराभव झाला, तर भारतीय संघाचा नेट रनरेट हा बांगलादेशपेक्षा जास्त असणं गरजेचं असणार आहे.न्यूझीलंड संघासाठी कसं असेल सेमीफायनलमध्ये जाण्याचं समीकरण?इंग्लंडने भारतीय संघाला पराभूत केल्यामुळे न्यूझीलंडचं काम सोपं झालं आहे. पण भारतीय संघाविरुद्ध होणारा सामना हा न्यूझीलंडसाठी देखील महत्वाचा असणार आहे. न्यूझीलंडचे पुढील दोन सामने भारत आणि इंग्लंडविरुद्ध होणार आहे. जर हे दोन्ही सामने न्यूझीलंडने जिंकले तर न्यूझीलंडचा संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करू शकतो. जर भारतीय संघाविरुद्ध होणाऱ्या सामन्यात न्यूझीलंडचा पराभव झाला, तर न्यूझीलंडचा प्रवास इथेच संपेल.पण भारतीय संघाला पराभूत करून इंग्लंडकडून पराभव झाला, तरीदेखील न्यूझीलंडकडे सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी असणार आहे. त्यासाठी श्रीलंकेने बांगलादेशला आणि बांगलादेशने भारतीय संघाला पराभूत करणं गरजेचं असणार आहे. असं झाल्यास न्यूझीलंडचा संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करू शकतो.

# पाकचा कर्णधार बदला-चा सिलसिला सुरूच!

मोहम्मद रिझवानकडून वनडे कर्णधारपद काढून घेतले



पाकचा कर्णधार बदलाचा सिलसिला सुरूच! मोहम्मद रिझवानकडून वनडे कर्णधारपद काढून घेतले

लाहोर: पाकिस्तान क्रिकेटमध्ये कर्णधार बदलाचा खेळ पुन्हा एकदा सुरू झाला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने यष्टिरक्षक-फलंदाज मोहम्मद रिझवान याला एकदिवसीय क्रिकेटच्या कर्णधारपदावरून अचानक हटवले आहे. त्याच्या जागी वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी याला संघाचा नवा वनडे कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मोहम्मद रिझवानने गेल्या वर्षी (२०२४) ऑक्टोबरमध्ये बाबर आझमच्या राजीनाम्यानंतर वनडे आणि टी-२० संघाची कमान स्वीकारली होती. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने काही मालिका जिंकल्या असल्या तरी, या वर्षातील (२०२५) संघाची कामगिरी, विशेषतः वेस्ट इंडिजमधील मालिका पराभव आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमधून लवकर बाहेर पडणे, या पार्श्वभूमीवर पीसीबीने कर्णधारपद बदलण्याचा निर्णय घेतला. रिझवानच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने २० वनडे सामने खेळले, ज्यात ९ जिंकले आणि ११ गमावले. शाहीन आफ्रिदीची नियुक्ती व्हाईट-बॉल हेड कोच माईक हेसन आणि निवड समितीच्या बैठकीनंतर करण्यात आली आहे.

**शाहीन आफ्रिदीवर पुन्हा विश्वास**

शाहीन शाह आफ्रिदी याला यापूर्वीही टी-२० संघाचा कर्णधार बनवण्यात आले होते, परंतु न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत पराभव झाल्यानंतर त्याला पदावरून हटवण्यात आले होते. आता त्याला पुन्हा एकदा वनडे संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. शाहीन आफ्रिदी ४ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत कर्णधार म्हणून पहिल्यांदा जबाबदारी स्वीकारेल.

# अखेर पाकिस्तान महिला संघ विश्वचषकातून बाहेर

कोलंबो : महिला विश्वचषकामध्ये आता दोन संघांनी उपांत्य फेरीचे तिकीट निश्चित केले आहे. पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला, आणि दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला. या निकालाचा सर्वात मोठा फायदा झाला तो दक्षिण आफ्रिकेला. कारण ऑस्ट्रेलियानंतर उपांत्य फेरीमध्ये पोहोचणारा तो दुसरा संघ ठरला आहे.



या विश्वचषकामध्ये पावसामुळे अनेक सामने रद्द झाले असून त्यामुळे प्रत्येक सामन्यानंतर उपांत्य फेरीचं गणित अधिकच रंजक बनत चाललं आहे. आता अजून दोन स्थानं रिक्त आहेत, आणि त्यासाठी भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात तगडी लढत रंगली आहे. इंग्लंडकडे अजून तीन सामने बाकी असून त्यांना फक्त एक विजय उपांत्य फेरीत जाईल. म्हणजेच चौथ्या स्थानासाठी खरी झुंज भारत आणि न्यूझीलंडमध्ये आहे.

पाकिस्तान महिला वर्ल्ड कप २०२५ मधून बाहेर गेला आहे. त्यांच्याकडे फक्त २ गुण आहेत आणि दोन सामने बाकी आहेत. हे दोन्ही सामने जिंकले तरी ते जास्तीत जास्त ६ गुणांवर पोहचतील. त्याच वेळी भारत आणि न्यूझीलंड दोघांकडेही सध्या ४ गुण आहेत. भारत चौथ्या तर न्यूझीलंड पाचव्या क्रमांकावर आहे.

जर भारत आणि न्यूझीलंड पुढील सर्व सामने हरले, तरच पाकिस्तानला संधी मिळेल, जी अतिशय अवघड दिसते. श्रीलंका आणि बांगलादेशसुद्धा जास्तीत जास्त ६ गुणांपर्यंतच पोहोचू शकतात. भारताला उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी उरलेल्या तीन सामन्यांपैकी किमान दोन विजय आवश्यक आहेत. टीम इंडियाचा पुढील सामना रविवारी म्हणजे आज इंग्लंडविरुद्ध आहे, त्यानंतर न्यूझीलंड आणि बांगलादेशविरुद्ध लढती आहेत. भारत जर तीनपैकी दोन सामने जिंकला, तर तो ८ गुणांसह सेमीफायनलमध्ये स्थान निश्चित करेल.

मात्र पावसामुळे एखादा सामना रद्द झाला, तर भारताला एका पराभवाची किंमत चुकवावी लागू शकते. न्यूझीलंड अजूनही सेमीफायनलच्या शर्यतीत आहे आणि भारतासाठी सर्वात मोठा धोका देखील आहे. कीवी संघालाही आता इंग्लंड आणि भारताशी सामना करायचा आहे. जर न्यूझीलंडने यापैकी एक सामना गमावला, तर भारताला मोठा फायदा होईल. पण भारतानेही स्वतःचे सामने जिंकणे अत्यावश्यक आहे, अन्यथा सेमीफायनलचं समीकरण पुन्हा बिघडू

## इंग्लंडचा ४ धावांनी ऐतिहासिक विजय

इंदूर : महिला विश्वचषकामध्ये रविवारी भारतीय महिला क्रिकेट संघ विरुद्ध इंग्लंड महिला क्रिकेट संघात रंगलेल्या विश्वचषकाच्या महत्त्वपुर्ण साखळी सामन्यात इंग्लंडच्या महिला फलंदाजांनी जबरदस्त फलंदाजी करत भारतासमोर ५० षटकांत २८८ धावा ८ फलंदाजांच्या मोबदल्यात केल्या. त्यामुळे भारतीय महिला फलंदाजांसमोर २८९ धावांचे आव्हान उभा राहिले. मात्र भारतीय संघ हे आव्हान पुर्ण करू शकला नाही. त्यामुळे हा सामना इंग्लंडच्या संघाने अवघ्या ४ धावांनी जिंकला. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय महिला क्रिकेट संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. भारताची सलामीवीर प्रतिका रावळ ही ६ धावांवर ॲमी जोन्सकडे झेलबाद झाली. हरलीन देवोल ही २४ धावांवर चार्ली डिन हिच्याकडून पायचित बाद झाली. त्याआधी भारतीय महिला गोलंदाजांना इंग्लंडच्या महिला फलंदाजांनी चोप



चोप चोपले. यावेळी इंग्लंडची अनुभवी फलंदाज हेदर नाईट हिने १०९ धावा करत शानदार शतक केले. हेदर नाईट हिला सामनावीर म्हणुन गौरविण्यात आले. तिला साथ देताना ॲमी जोन्स हिने ५६ धावा करत अर्धशतक केले. त्याआधी सलामीवीर टॅमी बेमाउंट ही २२ धावांवर दिप्ती शर्माच्या गोलंदाजीवर त्रिफळाबाद झाली. नेट सिव्हर ब्रंट ३८ धावांवर हरमनप्रितकडे झेलबाद झाली. सोफिया डंकली हिने १५ धावा केल्या. इमा लांबा ११ तर ॲलिसा कॅप्सी ही २ धावांवर बाद होत तंबूत माघारी परतली.

## ही माझी चूक झाली..स्मृती मंडालाने घेतली पराभवाची जबाबदारी!

**इंदूर**-रविवारी इंदूरच्या होळकर स्टेडियमवर झालेल्या वुमेन्स वर्ल्ड कप सामन्यात इंग्लंडविरुद्ध भारताच्या चार धावांनी झालेल्या पराभवाची जबाबदारी भारताची स्टार सलामीवीर स्मृती मानधनाने घेतली आहे. ८८ धावा करणाऱ्या स्मृती मानधनाने पत्रकार परिषदेत पराभवाची जबाबदारी घेतली अन् सामन्याचा टर्निंग पाईंट सांगितला. त्यावेळी स्मृतीच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसत होती. २८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हरमनप्रीत कौर आणि स्मृती मानधनाने तिसऱ्या विकेटसाठी १२५ धावांची भागीदारी करत भारताला मजबूत स्थितीत आणले. स्मृतीच्या बाद झाल्यानंतर सामन्याचे चित्र बदलले आणि इंग्लंडने सामना जिंकला. ४२ व्या ओव्हरमध्ये स्मृती ८८ धावा करून आऊट झाली. गोलंदाज लिन्सी स्मिथला मोठा शॉट मारण्याचा प्रयत्न करताना स्मृती मानधना बाद झाली.मी स्वत:ला जबाबदार धरते...

शेवटच्या ५२ बॉलमध्ये फक्त



### ४७ व्या ओव्हरमध्ये काय घडले?

५५ धावा हव्या असतानाही भारत लक्ष्य गाठू शकला नाही. मानधना म्हणाली की, धावांच्या बाबतीत माझी शॉट निवड अधिक चांगली असू शकली असती. विशेषत: कारण ते माझ्यापासून सुरू झालं होतं. त्यासाठी मी स्वत:ला जबाबदार धरते. माझी शॉट सिलेक्शन चांगली असायला हवी होती. कदाचित आम्ही खेळ अधिक खोलवर नेण्याचा प्रयत्न करायला हवा होता, असंही स्मृती मानधना म्हणाली आहे.पुढचा सामना आमच्यासाठी क्वार्टर फायनल आम्ही अजून बसून त्यावर अद्याप चर्चा केलेली नाही. पण क्रिकेटमध्ये काहीही सोपे नसते. अर्थात, पुढचा सामना पहिल्या चारमध्ये स्थान मिळविण्यासाठी व्हर्च्युअल क्वार्टर फायनल असेल. पण हो, तुम्हाला क्रिकेट खेळण्यासाठी सोपा दिवस नकोय, असंही स्मृती मानधना म्हणाली आहे. इंग्लंडचा उपांत्य फेरीत प्रवेश दरम्यान, भारताला सलग तिसरा पराभव पत्करावा लागला दक्षिण आफ्रिकेनंतर इंग्लंड उपांत्य फेरीत प्रवेश करणारा तिसरा संघ ठरला.

### फिक्सिंग बॅन झालेल्या खेळाडूला पाकिस्तानने उतरवलं मैदानात

**इस्लामाबाद**-पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेतील टेस्ट मालिकेच्या दुसऱ्या सामन्याची सुरुवात रावळपिंडी क्रिकेट मैदानावर झालीय. पाकिस्तानी कप्तान शान मसूदने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यानंतर टीम बॅटींगसाठी मैदानात उतरली. या सामन्यात हसन अलीच्या जागी डाव्या हातच्या फिरकी गोलंदाज आसिफ अफरीदीला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळालंय. हा अफ्रीदीसाठी पाकिस्तानसाठीचा पहिला आंतरराष्ट्रीय सामना आहे. विशेष म्हणजे तो ३८ वर्षांच्या वयात टेस्ट क्रिकेटमध्ये पदार्पण करतोय. कसे राहीलेय करिअर?२५ डिसेंबर १९८६ रोजी पेशावर येथे जन्मलेला आसिफ अफ्रीदी २ महिन्यांतच ३९व्या वर्षात पदार्पण करतोय. जानेवारी २००९ मध्ये त्याने पहिला फर्स्ट क्लास सामना खेळला. ज्यात आतापर्यंत ५७ सामन्यांत १९८ विकेट्स घेतल्या.

# तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण..विराट -रोहितच्या फ्लॉप शोवर लक्षवेधी प्रतिक्रिया

**नवी दिल्ली:** भारतीय संघाचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने विराट कोहली आणि रोहित शर्माबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे.

भारताचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला ७ गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा सामना रोहित शर्मा आणि विराट कोहलीसाठी अतिशय महत्वाचा होता. कारण दोन्ही फलंदाज ७ महिन्यानंतर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी मैदानात उतरले होते. पण दोन्ही फलंदाज पहिल्याच सामन्यात फ्लॉप ठरले आहेत. रोहित शर्मा अवघ्या ८ तर विराट कोहली शून्यावर माघारी परतला. दरम्यान भारताचा माजी फलंदाज मोहम्मद कैफने विराट कोहली आणि






रोहित शर्माबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. मोहम्मद कैफच्या मते, विराट कोहली आणि रोहित शर्माने आधीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. दोघांनीही लवकर ऑस्ट्रेलियाला जाणं टाळलं,

याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, ङ्गविराट कोहली आणि रोहित शर्माकडे सुवर्णसंधी होती, पण त्यांनी संघासोबत जाणं ठरवलं. कारण त्यांना माहीत आहे की, लोकं आपल्यासोबत आहेत. विराट इंग्लंडमध्ये होता. त्यामुळे त्याच्यावर दबाव होता. तो जर परस्पर ऑस्ट्रेलियाला निघून गेला असता तर अडचणी वाढल्या असत्या. त्यामुळे तो फसला.ङ्ख

विराट आणि रोहितची नेमकी चूक काय झाली?

याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, ङ्गया दोघांनीही ८-१० दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण क्रिकेट हा रिदमचा खेळ आहे. जर तुम्ही पूर्णपणे तयार नसाल तर ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघासमोर तुमचा निभाव लागणार नाही. म्हणून मला वाटतं की, आधी गेले असते तर बरं झालं असतं. रोहित अशा चेंडूवर पूल करून षटकार मारतो.

मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना विराट, रोहित आणि गिल हे तिन्ही फलंदाज फ्लॉप ठरले. तर केएल राहुलने ३८ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. या खेळीच्या बळावर २६ षटकांअखेर भारतीय संघाने ९ गडी बाद १३६ धावा केल्या. ऑस्ट्रेलिया डकवर्थ लुईस नियमानुसार १३१ धावा करायच्या होत्या. हे आव्हान ऑस्ट्रेलियाने २२ व्या षटकात पूर्ण करत सामना खिशात घातला.

# ज्ञानासोबत भक्तीचा संगम ५००० दिव्यांच्या प्रकाशात साजरा पर्यावरणपूरक महादीपोत्सव

## माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांच्या हस्ते सोहळा संपन्न

### स्टीम एज्युकेशन सेंटर व श्री काशी विश्वेश्वर मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी सणानिमित्त ''महादीपोत्सवा'' चे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील सुप्रसिद्ध स्टीम एज्युकेशन सेंटर व श्री काशी विश्वेश्वर मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी सणानिमित्त ''महादीपोत्सवा'' चे आयोजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या शुभहस्ते, षा.ब्र.श्री १०८ निरंजन शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात आणि विद्यार्थी-शिक्षक-पालक यांच्या प्रमुख उपस्थितीत ५००० दिव्यांच्या प्रकाशात पर्यावरणपूरक महादीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी स्थानिक नागरिक, स्टीम एज्युकेशन सेंटरच्या विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी तसेच पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन परिसराला या दीपोत्सवात मातीचे दिवे, नैसर्गिक तेल आणि पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करून पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देण्यात आला.





कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले, त्यानंतर उपस्थितांच्या माध्यमातून ५००० दिव्यांच्या उजेडाने संपूर्ण परिसर लखलखीत झाला आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले.या उपक्रमातून शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव आणि पर्यावरणप्रेम जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. ''भक्तीबरोबर पर्यावरण जपा'' हा संदेश या दीपोत्सवातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा हेतू सफल झाल्याचे यावेळी स्पष्ट झाले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री काशी विश्वेश्वर मंदिराचे विश्वस्थ मन्मथ पंचाक्षरी यांनी श्री काशी पिठाच्या वतीने होत असलेल्या विविध धार्मिक सामाजिक आणि शैक्षणिक कार्याबाबत माहिती देत श्री काशी विश्वेश्वर मंदिराच्या उभारणीमध्ये माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या माध्यमातून मोलाचे सहकार्य लाभले व परिसरातील अनेक विकास कामे झाली याबाबत उपस्थिताना माहिती देत त्यांचे दिलीपराव देशमुख यांच्याबद्दल कृतज्ञता व आभार व्यक्त केले

स्टीम एज्युकेशन सेंटरचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरुळे यांनी आपल्या मनोगतात मनोगतात माजी मंत्री, दिलीपरावजी देशमुख यांना त्यांच्या अमृत महोत्सवी जन्मवर्षा निमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. पुढे बोलताना सांगितले की लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी आहे.शिक्षण, सहकार, क्रीडा, समाजकारण आणि ग्रामीण विकास या सर्व क्षेत्रांत त्यांनी दाखवलेले नेतृत्व, दूरदृष्टी आणि संवेदनशीलता लातूर जिल्ह्याला नवे पर्व देणारे ठरले आहे. देशमुख साहेबांच्या प्रयत्नांमुळे लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था सक्षम झाल्या, क्रीडा संस्कृतीला नवा वेग मिळाला,सहकार चळवळीला दिशा मिळाली आणि समाजातील सर्व घटकांना प्रगतीचा मार्ग सापडला. त्यांच्या कार्यामुळे लातूर जिल्ह्याची ओळख शैक्षणिक, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात अग्रगण्य जिल्हा म्हणून झाली आहे त्याचे सर्व श्रेय दिलीपराव देशमुख यांच्याकडे जाते असा उल्लेख त्यांनी यावेळी केला

गतिमान जगाला दिशा देण्याचे काम अध्यात्मशिवाय अशक्य- माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन

यावेळी बोलताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले की गतिमान जगाला दिशा देण्याचे काम अध्यात्मा शिवाय होऊ शकत नाही, यासाठी एकाग्र चित्ताने सदैव कार्य मग्न राहत स्वतः, कुटुंबीय व सामाजिक प्रगती साध्य करावी असे सांगून त्यांनी स्टीम एज्युकेशन सेंटर च्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. तसेच काशी विश्वेश्वर मंदिर व परिसरातील विकास कामाबद्दल समाधान व्यक्त करीत भविष्यातील कामासाठी विश्वस्त मंडळास सूचना केल्या.शेवटी त्यांनी उपस्थित सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी महापौर दीपक सूळ,स्टीम एज्युकेशन सेंटरचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरुळे, प्रा. मन्मथ पंचाक्षरी, बसवंत भरडे, राम स्वामी, बालाजी पिंपळे, धवल मशरू, बाबुराव वडगावे, दीपक वांगस्कर, डॉ. भालचंद्र पैके, विजय टाकेकर, शिवकान्त स्वामी, करबसं पोपडे, ओंकार पांचक्षरी, सांगप्पा बावगे, शिवाजी देशमुख, पुष्पराज खुब्बा, बालाजी झिपरे, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख व्हॉईस चेअरमन अँड प्रवीण पाटील मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे,मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव सचिन पाटील सचिन दाताळ,संभाजी सुळ दयानंद बिडवे यांच्यासह स्टीम एज्युकेशन सेंटर, माऊंट कार्मेल इंटरनॅशनल स्कुल च्या प्राचार्या उमा माने, स्टीम इंटरनॅशनल प्री स्कुलच्या प्राचार्या पूनम पाठक, प्राचार्या अंजु व्यास, प्राचार्या गौरी देशमुख आदी मान्यवार उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या भेटी घेत दिल्या सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा..

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सोमवार दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेत निवेदने व निमंत्रणाचा स्वीकार करीत संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या तसेच सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.





यावेळी माजी आमदार विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन वैजनाथ शिंदे,लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके,लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव,दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव-रमेश बियाणी, लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य- धनंजय देशमुख,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती- जगदीश बावणे,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव-ॲड.समद पटेल,रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष-संतोष देशमुख,सिए-प्रकाश कासट,डॉक्टर कल्याण बरमदे,बळवंत पाटील, रामदास पवार,चांदपाशा इनामदार चंद्रशेखर दंडीमे, इम्रान सय्यद,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष-सुभाष घोडके, शाम देशमुख, चंद्रकांत धायगुडे, अंगद वाघमारे, बालाजी झिपरे, अकबर माडजे,ॲड.अंगद गायकवाड, भालचंद्र पाटील, विलास भोसले,पिराजी साठे, आसिफ बागवान, अभिजीत इगे,आनंद पाटील, गुरुनाथ गवळी, बालाजी देशमुख,मनोज चिखले, व्यंकटेश पुरी,शफिक शेख,दिलीप माने,रवींद्र काळे, सचिन बंडापले,कैलास कांबळे, पवनकुमार गायकवाड, ॲड.विजय गायकवाड,प्रा.डॉ. सिद्राम कटारे,पंडित कावळे, ऋषिकेश पाटील, बालाप्रसाद बीदादा, रमेश सूर्यवंशी, सिकंदर पटेल, विष्णुदास धायगुडे, प्राचार्य डॉ.आनंद पवार, राज गीत्ते, विठ्ठलराव माकणे, डॉ. लक्ष्मण देशमुख, सतीश पाटील, महादेव देशमुख, बाभळगावचे उपसरपंच- गोविंद देशमुख, महेश इंगळे, कुणाल शृंगारे, सुपर्ण जगताप, डॉ. बी. आर. पाटील,विजय टाकेकर, अरफात खान, रमेश थोरमोठे पाटील, जयचंद भिसे, किरण बनसोडे, महादेव जटाळ, भीमा शिंदे, सतीश देशमुख,श्रावण मस्के आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते विलास को-ऑपरेटिव्ह बँकेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य- सीए संदीप नवटक्के यांच्या महिंद्रा कंपनीच्या नूतन एक्सयुव्ही (७००) या चारचाकी कारचे पूजन करण्यात आले.

# ग्रामीण भागाच्या विकासाला गती देणार

## नरवटवाडी येथे भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांचा जाहीर सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लातूर ग्रामीण मतदार संघात ग्रामीण भागाच्या विकासाला गती देणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात होणार असून या निवडणुकीत कमळ हेच भाजपाचा उमेदवार आहे, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा चेहरा असून विरोधात ज्यांना कुणाला जिथ जमल तिथं तयारी करावी. आम्ही चारी मुंड्या चित केल्याशिवाय राहणार नाहीत असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी केले.




रेणापूर तालुक्यातील मौजे नरवटवाडी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजयुमोचे नूतन जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांचा भाजपाचे नेते जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, चिटणीस दशरथ सरवदे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, भाजयुमोचे मंडल अध्यक्ष अमर चव्हाण, उत्तम पवार, श्रीकृष्ण जाधव, सरपंच सुकेश शिंदे, कार्यक्रमाचे संयोजक संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ऋषिकेशदादा कराड यांचे फटाक्याची आतिषबाजी करत ढोल ताशाच्या गजरात जेसीबीतून फुले उधळून जोरदार स्वागत करण्यात आले.

सत्कार सोहळ्यात बोलताना युवा नेते ऋषिकेश दादा कराड म्हणाले की, गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत केलेल्या कामाची दखल घेऊन भाजपा नेतृत्वाने माझ्यावर युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. पद मिळाल्याने पत मिळत नाही, लातूर ग्रामीण मतदार संघातील तरुणासह सर्वसामान्य जनतेनी माझ्यावर प्रेम करून मला मोठी साथ दिली जिल्हाध्यक्ष पदाच्या लाईक केले हे मी कदापि विसरू शकत नाही.

मिळालेल्या पदाच्या माध्यमातून तरुणात पक्षाच्या संघटनात्मक कामाबरोबरच पक्षाला यशाकडे घेऊन जाण्यासाठी जिकरीचे प्रयत्न करणार असून भाजपाच्या विजयाचा गुलाल जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळ्यासमोर आपल्या सर्वांना उधळायचा असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, गडीवरच्या नेत्याला रेणापूरच्या कुस्तीच्या मैदानात जाहीर सांगून विधानसभा निवडणुकीत पराभूत केले. त्यामुळे आता विरोधात कोणीही उमेदवार आला तरी काहीच फरक पडत नाही. लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपा आणि आपले नेते रमेशआप्पा कराड हेच उमेदवार निश्चित करणार आहेत तेव्हा सर्वांनी कमळ हेच उमेदवार समजून आतापासून जिद्दीने जोमाने कामाला लागावे असेही आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरूके म्हणाले की, भाजपाच्या झेंड्याचा युवा मोर्चा हा दांडा असून सामाजिक कार्याचे संस्कार असलेल्या कराड कुटुंबीयातील युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या कार्याची दखल घेऊन योग्य आणि सक्षम निवड पक्षाने केली. कोणतेही पद शोभेची वस्तू नाही. खरे तर जिल्ह्याच्या राजकीय कुरुक्षेत्रातील ऋषिकेश तारा आहे. जिल्हाध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी असून निश्चितपणे या पदाला न्याय देतील संपूर्ण जिल्ह्यात भाजपाच्या युवक संघटनेचे मजबूत जाळे निर्माण करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमात नवनाथ भोसले, दशरथ सरवदे, उत्तम पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करून ऋषिकेश कराड यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या प्रारंभी कार्यक्रमाचे संयोजक संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका विशद केली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दत्तात्रय आंबेकर यांनी आभार मानले.

या सत्कार सोहळ्यास ओम चव्हाण, वैजनाथ लहाने, संजय डोंगरे, विजय चव्हाण, भागवत गीते, अर्जुन कांदे, सुंदर घुले, माधव घुले, बसवराज पाटील, उद्धव केदार, माणिकराव डोंगरे, विलास नागरगोजे, बालाजी केंद्रे, नाथराव गीते, मंचक केंद्रे, दिलीप पाटील यांच्यासह पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सतीश आंबेकर, व्यंकटराव आघाव, नवनाथ शिंदे, जगन्नाथ आंबेकर, सदाशिव पवार, दत्ता आंबेकर, भाऊसाहेब आंबेकर, संतोष घोडके, प्रल्हाद आघाव, बालाजी आघाव, ज्ञानोबा आंबेकर, गणेश आघाव, महादू आघाव, प्रशांत आघाव, काशिनाथ आंबेकर, गोविंद चिताडे, पांडुरंग आंबेकर, हनुमंत आंबेकर, कल्याण केंद्रे यांच्यासह इतर अनेकांनी स्वागत केले.

## प्रेमाला कुटुंबीयांचा विरोध,लातूरला दोघांची आत्महत्या: एकाच दोरीला गळफास; अंबाजोगाईच्या प्रेमीयुगुलाने संपवले जीवन

**लातूर/प्रतिनिधी :** भावकीतील दोघांचे एकमेकांवर प्रेम जडले. ४वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रेमप्रकरणाचीकुणकुण दोघांच्या कुटुंबांना लागली होती.त्यामुळे नात्याला बदनाम करू नका, असासल्ला त्यांना देण्यात आला होता. मात्र एकमेकांशिवाय जगू शकत नाही, असे सांगत प्रेमीयुगुलाने लातूर शहरापासून जवळचअसलेल्या पेठ शिवारात एकाच दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. रविवारी (१९ऑक्टोबर) सकाळी हा प्रकार उघडकीसआला. नितीन संदिपान दराडे (२९) व राणी मालाबा दराडे (२४, दोघे रा. दरेवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड) अशी मृतांची नावेआहेत, अशी माहिती मृताच्या नातेवाइकांनी पोलिसांना दिली.


राणी दराडे


नितीन दराडे

लातूरपासून जवळच असलेल्या पेठशिवारातील शेतात पत्र्याचे शेड आहे. शेतातकोणीही राहत नसल्यामुळे हे शेड उघडेचअसते. रविवारी सकाळी शेतमालक धरणेशेतात गेले असता त्यांना त्यांच्या पत्र्याच्याशेडमध्ये दोघांनी गळफास घेतल्याचे दिसले.

बीड जिल्ह्यातील दरेवाडी (ता. अंबाजोगाई)येथील रहिवासी असलेले दोघे एकाचभावकीतील होते. त्यांचे प्रेम कुटुंबाला मान्यनव्हते. त्यामुळे प्रेमसंबंध ताबडतोब थांबवा,असे दोघांच्या कुटुंबीयांनी त्यांना सांगितलेहोते. परंतु त्यांच्यात काहीच बदल झाला नाही.नितीन सुशिक्षित असून कामाच्या शोधातहोता. तर राणी लातूर येथे स्टाफ नर्स म्हणून काम करत होती.तिला भेटण्यासाठी नितीन लातुरात आलाहोता. त्यानंतर दोघांनी आत्महत्या केलीअसावी, अशी माहिती पोलिसांनी दिली.

नितीन आणि राणी यांनी शनिवारी सायंकाळीच आपले मोबाइल बंदकेले होते. फोन बंद झाल्यामुळेनातेवाईक काळजीत होते. सकाळीघटनेची माहिती मिळताच पोलिसघटनास्थळावर पोहोचले.घटनास्थळी पोलिसांना दोघांचेहीमोबाइल बंद असलेले आढळले.पोलिसांनी मोबाइल स्वीच ऑनकरताच नातेवाइकांचे कॉल आले.कॉलला पोलिसांनी उत्तर देतनातेवाइकांना घटनेची माहिती दिली.

**दरेवाडी गावात पेटली नाही चूल**

दिवाळीच्या काळात घडलेल्या या घटनेमुळेदरेवाडी गावावर शोककळा पसरली आहे. याघटनेमुळे रविवारी गावात चूल पेटली नाही.दोघांच्या अंत्यसंस्काराला परिसरातील ग्रामस्थमोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पोलिसांनी पाहणी केल्यानंतर पटली दोघा मृतांची ओळख**

घटनेची माहिती पोलिस पाटील आणि लातूर ग्रामीण पोलिसांना कळवण्यातआली. पोलिस निरीक्षक अरविंद पवारयांनी घटनास्थळी पाहणी केल्यानंतरदोघांची ओळख पटली. या संदर्भातलातूर ग्रामीण पोलिसांत अकस्मात मृत्यूचीनोंद करण्यात आली आहे. शवविच्छेदनकेल्यानंतर मृतदेह नातेवाइकांना दिले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# नारंगवाडीची वाडी येथे हरिनाम सप्ताहात समर्थ महाराजांची कीर्तनसेवा, श्रोते मुग्ध



नारंगवाडी (प्रतिनिधी)–**सत्य साच खरें । नाम विठोबाचें बरें ।। येणें तुटती बंधनें । उभयलोकी कीर्ति जेणें ।।**

या अभंगावर निरूपण करताना समर्थ महाराज म्हणतात... मानवाने आयुष्यात खरेपणा आणि परमार्थ यांचा संग करावा. विठ्ठलनामाचे स्मरण हेच जीवनाला दिशा देणारे सूत्र आहे. जेथे नाम, तेथे समाधान आणि परमेश्वराची कृपा हेच संतांचे तत्त्वज्ञान आहे. अशी व्याख्या निरूपणात केली. काणेगावचे बाल कीर्तनकार समर्थ महाराज यांची हृदयस्पर्शी कीर्तनसेवा, संगीत विशारद राजेंद्र मडोळे व स्वरमणी रमेश करणुरे यांची साथसंगत यामुळे कीर्तन बहरले. नारंगवाडीचीवाडी (ता. उमरगा) अखंड हरिनाम सप्ताहाच्या पावन पर्वामुळे नारंगवाडीची वाडी भाग भक्तिमय झाला असून, संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला. या सप्ताह सोहळ्याच्या तिसऱ्या दिवशी कीर्तन झाले. 'सत्य आणि हरिनामाचे सामर्थ्य' विषयावर प्रभावी कीर्तन समर्थ महाराजांनी प्रारंभी नामसंकीर्तनाचे महत्त्व पटवून देत हरिनामाचे पावित्र्य आणि त्यातून मिळणारी आत्मिक शांती याचे सार रंगवले. कीर्तनाची मांडणी साधी, सरळ आणि मनाला भिडणारी होती. कीर्तनातून सत्य, धर्मनिष्ठा, नीतिमत्ता आणि संतांचा मार्ग समाजाने का अनुसरावा याचे निरूपण केले.

भक्तिमय वातावरणात संगीताची सुंदर मैफल या कीर्तन कार्यक्रमास उत्कृष्ट संगीताची साथ लाभली. संगीत विशारद राजेंद्र मडोळे (जवळगा बेट) यांनी टाळ–मृदंग वादनातून कार्यक्रमाची उंची वाढवली. तर स्वरमणी रमेश करणुरे यांनी संयत, माधुर्यपूर्ण गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

# पुण्यधाम ट्रस्टतर्फे शिरसाव, कळंबच्या शेतकऱ्यांना मदत



धाराशिव(प्रतिनिधी)–पावसाने शेती आणि शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करत पुण्यधाम आश्रम ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने शिरसाव (ता. परंडा) व कळंबमधील गरजू शेतकऱ्यांना ब्लँकेट, साडी, विद्यार्थ्यांसाठी नोटबुक व पेरणीसाठी हरभरा बॅग असे सुमारे सहाशे किटचे वाटप करण्यात आले. या वेळी पुण्यधाम आश्रम ट्रस्टचे सचिव घनश्याम झवर, खजिनदार पंकज देडिया, सदस्य सतीश बजाज, नीलेश काकडे, संभाजी यांच्या टीमने ॲड. शशिकांत पागे, धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनात शिरसाव (ता. परंडा) येथे अनंत जाधव व बंटी पाटील यांच्या मदतीने गरजू शेतकऱ्यांना ब्लँकेट, साडी, विद्यार्थ्यांसाठी वह्यांच्या ३०० कीट वाटप केल्या. कळंब येथे बाळासाहेब धस यांच्या मदतीने रब्बी पेरणीसाठी लागणारे १५० हरभरा बॅगचे वाटप केले. सामाजिक बांधिलकी जोपासत पुणे येथील पुण्यधाम ट्रस्टच्यावतीने ही मदत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष जाऊन देण्यात आली.

# इदगाह परिसरातील रस्ता खुला करून द्या: वेताळनगर भागातील रस्त्याचा प्रश्न




तुळजापूर(प्रतिनिधी)–शहरातील वेताळ नगर भागातील येथील इदगाह परिसरातून जाणारा जुना रस्ता कायमस्वरूपी खुला करून देण्याची मागणी नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. रस्ता खुला करून न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. वेताळनगर भागातील रहिवाशांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, इदगाह उत्तर बाजूस राहणाऱ्या नागरिकांना चारचाकी वाहने येण्यासाठी कोणताही मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे वृद्ध, आजारी तसेच अपंग व महिलांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अग्निशमन, रुग्णवाहिका वा इतर आपत्कालीन सेवा रस्ता नसल्याने त्या भागात पोहोचू शकत नाहीत. सदर भागातील नागरिकांना अंत्यविधीसाठी अवघ्या ५०० मीटरवरील स्मशानभूमीसाठी रस्ता बंद झाल्याने तब्बल २ ते ३ किलोमीटरचा वळसा घालावा लागत आहे. तरी सदर इदगाह रस्ता तातडीने खुला करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांतून देण्यात आला आहे. निवेदनावर सुनील घाडगे, प्रकाश पुणेकर, विक्रम सावंत यांच्यासह इदगाह भागातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

मतांसाठी लांगुलचालन इदगाह मैदानातून घाटशिळ रोडकडे जाणारा २० ते ५० फुट रूंद रस्ता खुला होता. परंतु गेल्या काही वर्षांत राजकीय दबावातून त्या ठिकाणी २०० ते २५० फुटांची भिंत बांधण्यात आल्याने रस्ता अडविण्यात आला आहे. केवळ मतासाठी लांगूलचालन सुरू असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

# धाराशिव न.प. शाळा क्र.२० मध्ये साकारली किल्ले पन्हाळा प्रतिकृती



धाराशिव(प्रतिनिधी)– येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र. २० च्या विद्यार्थ्यांनी नुकतेच किल्ले पन्हाळाची आकर्षक प्रतिकृती साकारून आपल्या कलात्मकतेला आणि ऐतिहासिक कलागुणांना वाव दिला. आजादी का अमृत महोत्सव आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेत या उपक्रमांतर्गत पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. या उपक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून आणि मातीचा वापर करून किल्ले पन्हाळाची प्रतिकृती तयार केली. यासाठी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आणि किल्ल्यांचे महत्त्व समजावे, या उद्देशाने याचे आयोजन केले होते. प्रतिकृती बनवताना विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन आणि शौर्याचे धडे गिरवले. महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृतीत गडकिल्ल्यांना विशेष महत्त्व आहे. हे गड किल्ले संवर्धन व्हावे, धर्माचे पालन, स्वराज्याचे संरक्षण व छत्रपती शिवाजी महाजांच्या शौर्य व पराक्रमाचे प्रतीक आहेत. त्यामुळे हे गडकिल्ले विद्यार्थ्यांना माहीत व्हावेत. यासाठी नगरपरिषद शाळेतील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षिका सारिका श्रीकांत माळोदे यांच्या मार्गदर्शनात इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थीनी पन्हाळगड प्रतिकृती साकारली. उभारणी उभारणी उपक्रमात आर्यन विधाते, अंश चकाले, अमन अंकुशे, वैष्णवी भंझोडे, समृध्दी तंबरे, पायल झुंबाडे, प्राची नागटिळक, पूजा, राजलक्ष्मी यांच्यासह इतर विद्यार्थी सहभागी झाले होते. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत माळोदे, सहशिक्षिका विजयलक्ष्मी बोंदर, संगीता नीले, अध्यक्ष जयंत इंदापूरकर व इतर शिक्षकांनी भेट देऊन मुलांचे कौतुक केले. कलाकृतींचे नागरिकांनी कौतुक केले.

किल्ले प्रतिकृतीचे उदघाटन शालेय समिती अध्यक्ष चकाले यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि मेहनतीचे भरभरून कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारसा जतन करण्याची आणि सामूहिक कामाची भावना वाढीस लागल्याचे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालक वर्गातूनही समाधान व्यक्त होत आहे.

# एकलव्य विद्या संकुलात पालक मेळावा, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान



धाराशिव (प्रतिनिधी)– एकलव्य विद्या संकुल मंगरूळ येथे प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. प्रथम सत्रातील हा मेळावा १३५ पालकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. मेळाव्यासाठी संस्थेचे पदाधिकारी तसेच जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांताचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर यांनी केले.

यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २५ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देण्यात आली. जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम यांनी पालकांना मार्गदर्शन केले, तर मुख्याध्यापक म्हेत्रे सर यांनी शालेय उपक्रम व शिस्तीबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या. या मेळाव्यात भटके विमुक्त समाजातील पदवी पूर्ण करून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी शिष्यवृत्ती योजनेचा शुभारंभ करण्यात आला. जनकल्याण समितीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने दरवर्षी भटके विमुक्त समाजातील शेवटच्या १० मागास जमातींपैकी दोन विद्यार्थिनींना प्रत्येकी एक लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येते. यंदा या योजनेअंतर्गत जळगाव आणि पिंपरी चिंचवड येथील दोन युवतींना ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

या योजनेचा उद्देश परागजी कंगले यांनी पालकांसमोर स्पष्ट केला. कार्यक्रमाचा समारोप भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर यांनी केला. आभारप्रदर्शन अण्णासाहेब मगर यांनी केले, तर सूत्रसंचालन अनिल घुगे यांनी केले.

# पुरात वाहून गेलेल्या कुटुंबियांना केली आर्थिक मदत: एक हात मदतीचा ग्रुपचा आधार !

धाराशिव (प्रतिनिधी) – यंदा शेतकरी अतिवृष्टी, महापूर आणि पिकांची नासाडी आदी सासख्या नैसर्गिक संकटात सापडलेला आहे. या पुरामध्ये काही शेतकरी वाहून गेले तर पिक वाहून गेल्यामुळे काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे कुटुंबाचे छत्र हरवलेल्या कुटुंबियांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा विवंचनेत सापडलेल्या कुटुंबाच्या मदतीला...एक हात मदतीचा ग्रुप..

धाऊन आला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून संबंधित कुटुंबियांच्या वारसास प्रत्येकी ५ हजार रुपयांप्रमाणे २२ कुटुंबांना १ लाख १० हजार रुपयांची रोख आर्थिक मदत करण्यात आली आहे. त्यामुळे हा ग्रुप अडचणीच्या काळात त्या कुटुंबांचा आधार बनला आहे.

धाराशिव व सोलापूर जिल्ह्यांवर निसर्गाचा प्रकोप झाला असून पुराच्या पाण्यात शेतकरी व नागरिक वाहून गेले. त्याबरोबरच शेतातील उभी पिके देखील मातीसह वाहून गेली आहेत. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या व पिक उध्वस्त झाल्यामुळे नैराश्यात सापडून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वारस सदस्य असलेल्या पत्नी व इतर नातेवाइकांना नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील नामपूर येथील एक हात मदतीचा या ग्रुपच्या माध्यमातून प्रत्येकी पाच हजार रुपये रोख स्वरूपात घरी तसेच बांधावर जाऊन ती मदत पोहोच केली आहे. ही मदत करण्यासाठी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, न्यूज १८ लोकमतचे संपादक विलास बडे व सामाजिक कार्यकर्ते राहुल भड यांचे मार्गदर्शन लाभले. हा ग्रुप नामपूर येथील असून यामध्ये बाहेरगावी नोकरी करणाऱ्या तरुणांचा समावेश आहे. गेल्या ९ वर्षांपासून या ग्रुपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, आश्रम शाळेत जाऊन विद्यार्थ्यां समवेत वाढदिवस साजरा करणे व इतर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या कुटुंबांना पंकज कापणीस, रोहिदास कापणीस, महेश कापणीस, अमोल पाटील, अविनाश मोरे व हर्षल कापडे, राहुल भड आदींसह संबंधित कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**जीएसयू/विद्युत काम (जी)**

सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **ई-निविदा सूचना क्रमांक:** ०७-२०२५-जीएसयू-इलेक्ट-जी, **दिनांक:** १७.१०.२०२५. **कामाचे नाव:** खालील विद्युत सेवा कामे (अ) पार्सल आणि गुड्स शेडशी संबंधित सुविधांची तरतूद: (i) सोलापूर सीजीएस कार्यालय आणि पार्सल कार्यालयाची तरतूद (ii) कलबुर्गी: पार्सल कार्यालयाची तरतूद (iii) कुर्डूवाडी: हमाल खोली आणि सीजीएस कार्यालयाची तरतूद (iv) वाडी: पार्सल कार्यालय आणि स्टोअर रूमची तरतूद (v) पंढरपूर: हमाल खोलीची तरतूद. (ब) वाडी - वाडी स्टेशनच्या पीएफ १/२ आणि ३/४ चे पुनर्संचयित करणे आणि इतर सुधारणा कामे. **कामाची अंदाजे किंमत:** रु. १,७०,९५,९२२.४८. **बयाणा रक्कम:** रु. २,३५,५००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ (बारा) महिने. **देखभाल कालावधी:** स्थापना सुरू झाल्यापासून / हाती घेतल्यापासून १२ (बारा) महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १०.११.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** १०.११.२०२५ दुपारी ३:३० नंतर. **वेबसाइट तपशील: टीप:** **www.ireps.gov.in** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: **www.ireps.gov.in**

मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (जीएसयू),
मध्य रेल्वे, सोलापूर.
DE/Sur-63
**असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है**

# 'तडजोड शुल्क' वसुल केले

धाराशिव (प्रतिनिधी)– धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१९ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण २०९ कारवाया करुन १,७२,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649